# प्रकरण - चौथे

# गौतम बुद्धांचे राजकीय विचार

## प्रकरण - चौथे

# गौतम बुद्धांचे राजकीय विचार

प्राचीन भारतीय सामाजिक आणि राजकीय तत्त्वज्ञानाला बौद्ध विचारांची मूल्यवान देणगी लाभली आहे. प्राचीन भारतामध्ये राजकीय विचारांची मांडणी राजधर्म, दंडनीती, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र या शिर्षकाखाली करण्यात आली. ही मांडणी आपणास मुख्यत्त्वे वैदिक साहित्य, ब्राह्मणग्रंथ, उपनिषदे, महाभारतातील शांतीपर्व, अर्थशास्त्रीय परंपरा आणि बौद्ध व जैन वाड्:मयामध्ये दिसून येते. बौद्ध वाड्:मयामध्ये स्वत: गौतम बुद्धांनी आपल्या शिष्यांना, वेगवेगळ्या राजांना, त्यांच्या आमत्यांना केलेल्या उपदेशामधून त्यांचे राजकीय विचार प्रतिबिंबित झाले आहे. पालीग्रंथ दीघनिकाय आणि बुद्धांच्या पूर्वजन्मावर आधारीत असलेल्या जातककथा हे साहित्य यामध्ये महत्त्वाचे आहे. गौतम बुद्धांनी आपल्या संपूर्ण तत्त्वज्ञानामध्ये शील व सदाचरणाला महत्त्वाचे स्थान दिले. त्यामुळे अर्थातच त्यांचे राजकीय विचारही शील व सदाचरणावरती आधारीत होते. डॉ. घोषाल यांच्या मते, "निर्भीड आणि उघड बुद्धिनिष्ठा"[१] हेच तर बौद्ध राजकीय विचारांचे एक प्रमुख वैशिष्ट्य होते. गौतम बुद्धांनी राजकारणाला नीतीचे अधिष्ठान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला. 'राजसत्ता ही कालाग्नीच्या ज्वालांवर ठेवल्यासारखी असते, ती बघता-बघता जळून खाक होते. सत्ताधाऱ्यांनी सत्तेचा अहंकार न मिरवता जनतेशी समान दृष्टीकोन ठेवून वागले पाहिजे. अन्यथा पक्षपातीपणामुळे जनतेत असंतोष धुमसू लागतो, त्यामुळे राज्यकर्त्यांनी ज्याप्रमाणे अध्यात्मिक साधना श्रेष्ठ असते, त्याचप्रमाणे राजनीतीसुद्धा एक श्रेष्ठ साधना आहे.[२] असा महत्त्वाचा उपेदश गौतम बुद्धांनी कौशांबीच्या उदयन राजाला केला. गौतम बुद्धांचा जन्म शाक्यगणराज्यामध्ये झाला होता. त्यांनी शाक्यसंघाच्या कामकाजाच्या पद्धतीचा जवळून अभ्यास केला होता. त्यामुळे त्यांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता, शांतता व मानवता आणि अहिंसा या मूल्यांचा पुरस्कार केला व या मूल्यांच्या आधारेच राजाने राज्यकारभार करावा असा उपदेश केला.

**धम्म, नीती आणि राजकारण यांचा परस्पर संबंध -**

गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचे मुख्य तत्त्व मानवाची दु:खापासून मुक्तता करणे हे होते. त्यासाठी त्यांनी धम्माचा मार्ग सांगितला. धम्म म्हणजे सदाचरण म्हणजेच जीवनाच्या सर्व क्षेत्रात माणसा-माणसातील व्यवहार उचित असणे.[३] समाज निर्मिती आणि समाजाच्या अस्तित्त्वासाठी माणसा-माणसातील संबंध सदाचरणावरती म्हणजेच धम्मावरती आधारीत असणे गरजेचे आहे. नीती म्हणजे डावपेच होय. एका माणसाचा दुसऱ्या माणसाशी जेव्हा संबंध येतो तेव्हा नीतीला प्रारंभ होतो.[४] अर्थात ही नीती प्रासंगिक किंवा आकस्मिक असू शकते, त्याचबरोबर ती सकारात्मक किंवा नकारात्मक ही असू शकते. शांती आणि सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी जगातील सर्वच धर्मामध्ये नीतीचा समावेश करण्यात आला आहे. त्यांनी नीतीला त्यासाठीचे एक साधन मानले आहे. परंतु गौतम बुद्धांनी आपल्या तत्त्वज्ञानामध्ये धम्म आणि नीती या दोन्ही संकल्पना एकाच अर्थाने वापरल्या आहेत. नीती हे गौतम बुद्धांच्या धम्माचे सार आहे व नीतीशिवाय त्यांचा धम्म नाही.[५] धम्म तत्त्वज्ञानानुसार जेव्हा माणूस-माणसावर प्रेम करतो तेव्हाच नीतीचा उगम होतो. गौतम बुद्धांनी केवळ नीतीस महत्त्वाचे स्थान दिले नाही तर ती नीती पवित्र आणि सर्वव्यवापी असली पाहीजे असा आग्रह धरला. चोरांमध्ये, व्यापाऱ्यात आणि दरोडेखोरांमध्येही आपापसात नीती असते परंतु या नीतीचे स्वरूप वेगळेपणाची जाणीव आणि आपल्यापुरतीच क्रियाशीलता निर्माण करणारे असते. ही नीती एका विशिष्ठ समुहाच्या हिताचे संरक्षण करण्यापुरतीच मर्यादित असते. म्हणजेच व्यापक अर्थाने ती समाज हिताच्या विरूद्ध असते. त्यामुळे समाज असंघटित होतो व अशा असंघटीत समाजामध्ये समाजामध्ये संघर्ष हा अटळ असतो. तेव्हा समाजामध्ये निर्माण होणाऱ्या अशा प्रकारच्या संघर्षाला खीळ घालण्यासाठी सर्वांना पवित्र वाटणाऱ्या अशा सर्वसामान्य नीती-नियमांची आवश्यकता असते.[६] त्याचबरोबर सर्वसामान्य व्यक्तीच्या विकासाला संरक्षण देण्यासाठी किंवा तिचा विकास घडवून आणण्यासाठीही पवित्र आणि सर्वव्यापी अशा नीतीची आवश्यकता असते. अर्थातच अशा नीती-नियमांची निर्मिती करणे, त्यांची अंमलबजावणी करणे व सर्वसामान्य

व्यक्तीचा विकास घडवून आणणे ही जबाबदारी राज्यसंस्थेची असते. त्यामुळे राज्यसंस्थाही पवित्र, सर्वव्यापी नीती-नियमांवर अधिष्ठित असली पाहिजे असा आग्रह गौतम बुद्धांनी धरला. सामाजिक न्याय, गोरगरीब जनतेचे कल्याण आणि नीतीमान समाजनिर्मिती व शांतता प्रस्थापित करण्यासाठी राजाने प्रयत्न करावेत असा उपदेश त्यांनी केला. गौतम बुद्धांनी राजांना व अमात्यांना केलेल्या उपदेशातून आपणास असे दिसून येते की, नागरिकांचे वर्तन परंपरागत आचार-विचारांना धरून असणे हे जितके शांततेस व सुव्यवस्थेस आवश्यक असते, त्याच्यापेक्षा मैत्रीच्या संबंधावर भर देणारे नैतिक वतर्न शांततेस व सुव्यवस्थेस अधिक पोषक ठरते म्हणून वर्ण-धर्मापेक्षा नीतीधर्म राज्यास अधिक बळकटी आणतो. किंबहुना राज्यसंस्थेचे नीतीस्थापना हेच ध्येय ठरते.[७]

अशा प्रकारे भगवान गौतम बुद्धांनी धम्म, नीती आणि राजकारण यांचा परस्परावर आधारीत संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. धम्म, नीती यांच्या आधारे जर राजाने राज्यकारभार केला तर त्या राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण होते. राजा किंवा राज्यसंस्था जर नीतीवान बनली तर संपूर्ण राज्यच नीतीधर्माचे पालन करते असे गौतम बुद्धांनी सांगितले.

**जातक कथांमधील राजनीतीसंदर्भातील उपदेश -**

बौद्ध वाङ्:मयामध्ये जातककथांना महत्त्वाचे स्थान आहे. गौतम बुद्धांनी स्वत: या कथा भिक्षूंना निरनिराळ्या प्रसंगानुसार सांगितल्या आहेत व या जातककथामधूनही गौतम बुद्धांचे राजनीतीसंदर्भातील विचार प्रकट झाले आहेत. अवारिय जातककथेत[८] (जा.क्र.३७६) गौतम बुद्ध राजाला उपदेश करताना म्हणतात की राजाने छन्द, दोष, काम व मोह या चार अगतींचा त्याग करून सावधपणाने क्षमा, मैत्री, दया यांनी संपन्न होवून राज्य करावे. 'तंडूनालिजातक'[९] कथेत (क्र.५) स्वत: बोधिसत्त्व राजाचा खरेदी-विक्री करणार अधिकारी होता. तो बुद्धिमान आणि प्रामाणिक होता परंतु; राजास बोधिसत्त्वाचे बुद्धिमानता आणि प्रामाणिकपणा आवडत नसे, कारण राजा लोभी होता. दुसऱ्यांच्या मालाच्या किंमती चुकीच्या ठरवून, त्याआधारे आपण धनवान बनू अशी

अपेक्षा ठेवून राजाने बोधिसत्त्वाला त्याच्या पदावरून काढून टाकले, कारण बोधिसत्त्वाला पदावरून दूर केल्याशिवाय त्यास हे शक्य नव्हते. बौधिसत्त्वानंतर राजाने त्याठिकाणी एका गावंढळ अधिकाऱ्याची नियुक्ती केली. तो परदेशातील मालाच्या किंमती राजाची मर्जी पाहून ठरवत असे. एके दिवशी त्याने उत्तरेकडून आलेल्या एका व्यापाऱ्याच्या पाचशे घोड्यांची किंमत मापटेभर तांदूळ ठरवली. त्यामुळे तो व्यापारी पूर्णपणे नागवला गेला व तो बोधिसत्त्वाकडे आला व त्याने घडलेली हकीकत बोधिसत्त्वास सांगितली. तेव्हा बोधिसत्त्वाने त्या व्यापाऱ्यास असे सांगितले की, त्या अधिकाऱ्याला लाच दे व हे तांदूळ विकायचे असे सांग व राजासमोर त्या मापटभर तांदळाची किंमत ठरविण्यास त्यास विनंती कर. अधिकाऱ्याने व्यापाऱ्याकडून लाच स्वीकारली व राजासमोर त्या मापटभर तांदळाची किंमत वाराणशीची राजधानी आणि तिच्या आसपासची गावे असे संपूर्ण राष्ट्रच ठरविली. जेव्हा तो अधिकारी मापटभर तांदळाची किंमत संपूर्ण राष्ट्रच ठरवितो तेव्हा सर्वच अधिकारी त्याच्या या वक्तव्यावर टाळ्या पिटून हसतात व राजाने याला अधिकारी ठेवलाच कसा म्हणून त्याची निर्भत्सना करतात. या घटनेने राजा मात्र ओशाळतो आणि त्या पदावरून त्या अधिकाऱ्यास काढून टाकतो व पुन्हा बोधिसत्त्वाची नेमणूक करतो. यावरून आपणास असे दिसून येते की, अधिकार पदावर नियुक्ती करावयाच्या व्यक्तीच्या अंगी प्रामाणिकपणा व बुद्धिमत्ता हे गुण असणे आवश्यक ठरते. नाही तर त्याच्याकडून योग्यप्रकारे न्याय्य अशा स्वरूपाचे काम होवू शकत नाही. राजावरही लोभीपणामुळे आपले राज्य गमाविण्याची वेळ येते.

तेसकुण जातककथे मध्ये[१०] (क्र.२५१) कोसलराजाला राजनीती संबंधित उपदेश करताना गौतम बुद्ध म्हणतात की, राजांनी धर्माने राज्य करावे कारण ज्यावेळी राजे अधार्मिक होतात त्यावेळी राजाशी संबंधित असलेले लोकसुद्धा अधार्मिक होतात. त्यामुळे राजाने उन्मत होवून प्रमादाने राज्य चालवू नये. जर राजाने अधर्माने राज्य चालविले तर ते राष्ट्र नष्ट होण्याची शक्यता असते. अशा राष्ट्रमध्ये कोणी कोणाचे ऐकत नाही. राज्यास स्वामी म्हणून कोणी राहत नाही. राज्य चालवणारे लोक बिघडले

की आतले आणि बाहेरचे लोकदेखील बिघडतात.[११] राजाचे क्षत्रियत्व नष्ट होते, जनपदे चोरांकडून लुटली जातात त्यामुळे राजाने योग्य न्यायधर्माप्रमाणे राज्य चालवावे. राज्यातील जनतेवर अधर्माने कर लादू नयेत.[११] जेव्हा नदीमध्ये गाई पोहतात तेव्हा त्या त्यांच्या नेता असलेल्या खोंडाच्या पाठीमागून जातात. परंतु ज्यावेळेस खोंड वाकडा चालतो, त्यावेळेस त्या सर्व गाईही त्याच्या मागे चुकीच्या मार्गाने जातात. अगदी तशीच अवस्था राज्याची असते. जर राजाच अधर्माने वागला, आपल्या कर्तव्यापासून दूर गेला तर संपूर्ण जनताही अधर्माने वागते.[१३] ते संपूर्ण राष्ट्रच यामुळे दु:खीत होते. त्यामुळे राजाने आपला धर्म पाळून राज्य करावे. तरच जनता त्याच्या पाठीमागून येते व असा नीतीवान, धर्मवंत राजाच राष्ट्राला समृद्ध बनवू शकतो.[१४] राजाने असत्य वचन केले तर तो दुर्गतीस पोहचतो त्याचा नाशच होतो असे चेतिय[१५] जातकामध्ये सांगितले आहे. तेसकुण जातक, राजोवादजातक (३३४) आणि गण्डनिण्डूक (५२०) या जातकामध्ये वरील विचार प्रकट झाले आहेत व त्यांचा विषय एकच आहे. तेसकुण जातककथेत वेसन्तर प्रश्न, कुण्डलिनी प्रश्न आणि जम्बुक पंडित प्रश्न यामध्ये राजधर्माची महत्त्वाची चर्चा करण्यात आली आहे. वेसन्तराच्या उत्तरानुसार राजाने सर्वप्रथम असत्य बोलणे टाळावे, क्रोधावर ताबा मिळवावा आणि चेष्टा टाळावी. त्याचबरोबर मोहाने अथवा दुष्टपणाने कोणतेही काम करू नये. सर्वांशी सहृदय भावनेने वागावे, सर्वांचे रक्षण करावे. अशा पद्धतीने राजाने आपले वर्तन ठेवले तर तो धनवान आणि धैर्यवान बनतो. आणि आपल्या शत्रूंचा नायनाट करतो.[१६]

कुण्डलिनी प्रश्नामध्ये राजाच्या कर्तव्याविषयी[१७] चर्चा करण्यात आली आहे. राजाने राज्यकारभार करीत असताना आपणाकडे ज्या गोष्टी नाहीत त्या मिळविण्यासाठी प्रयत्न करावा, त्याचबरोबर ज्या प्राप्त केलेले आहेत त्या सुरक्षित ठेवाव्यात. राजाने आपल्या राजदरबारामध्ये सुज्ञ, शांत व व्यवहारी अमात्यांची नियुक्ती करावी. ते लफंगे, मद्यपी, विनाशी आणि जुगारीवृत्तीचे असू नयेत. अमात्याने ज्याप्रमाणे सारथी रथाचे रक्षण करतो, त्याप्रमाणे राज्याच्या खजिन्याचे रक्षण करावे. राजाने आपल्या सर्व सेवकांना ताब्यात ठेवावे. एखाद्या कामासाठी निधी वा कर्ज देताना राजाने स्वत:च्या

मनाने विचार करून त्याचे वाटप करावे. ही कामे त्याने परबुद्धीने करू नयेत. राजाने अपराध्यास शिक्षा करावी व जे योग्य आहेत त्यांचा मान राखावा. राज्यातील जनपदाचा व्यवहार राजाने स्वत: चालवावा. त्याने ही जबाबदारी आपल्या मुलांवर सोपविली तर त्यांच्याकडून गैरमार्गाने राष्ट्रसंपत्ती खर्च होण्याचा संभव असतो. राजाने कोणतेही काम घाईने करून घेवू नये अथवा करू नये; कारण घाईने काम केल्यास त्याच्यावर पश्चातापाचीच वेळ येते. राजाने क्रोधाने बेभान होवू नये. निरंकुशपणे होवून राज्य करू नये नाहीतर अशा मोकाट व निरंकुश राजाचे भाग्य नष्ट होते व तो प्रजाजनांच्या निंदेस पात्र ठरतो. म्हणून राजाने कर्तव्यदक्ष, अमद्यपी, अविनाशी इत्यादी गुणांनी शीलवान बनून राज्य करावे. जो राजा या गुणांचे व कर्तव्यांचे पालन करीत नाही तो लयास जातो.

शेवटी जंबुक पंडीत राजाला सर्व बळामध्ये उत्तम बळ कोणते? याचे उत्तर देताना म्हणतो की, जगामध्ये पाच प्रकारची बले आहेत. त्यामध्ये बाहुबल हे शेवटचे बल आहे. त्यानंतर भोगबल हे दुसरे बल ठरते. व सर्वात महत्त्वाचे आणि पहिल्या नंबरचे बल हे प्रज्ञाबल[१८] आहे. व या पंचविध बलानी युक्त असलेला मनुष्यच नरश्रेष्ठ ठरतो. या पंचविध बलामध्ये प्रज्ञाबल हे सर्वात उत्तम बल आहे कारण एखाद्या क्षत्रिय राजकुमारास समृद्ध राज्य जरी लाभले व तो प्रज्ञावान नसेल तर त्याला राज्य चालविणे नव्हे तर स्वत:चे जीवन जगणेही कठीण होवून बसते. प्रज्ञेने कीर्ति वाढते व प्रज्ञेने प्रज्ञावंतास जगातील सर्व सुखे लाभतात. जो दु:शील होवून अधम्माने कार्य करतो, तो सदाचारी नसतो अर्थातच त्यामुळे त्याचे कार्यही नष्ट होते. अशा प्रकारे जंबुक पंडीताने राजास प्रज्ञाबळाचा महिमा सांगितला व राजाला पुढील उपदेश केला.

राजाने आपल्या माता-पिता, पुत्र आणि पत्नी तसेच मित्र, अमात्य, वाहक-सैन्य यांच्याबरोबर धर्माने वागावे त्याचबरोबर जनपद आणि निगम, श्रमण-ब्राह्मण, पशुपक्षी यांच्याबरोबरही धर्माने वागावे व या धर्माचे पालन करणाऱ्या राजाला चांगल्या कर्माची प्राप्ती होते. हीच राजाची कर्तव्ये ठरतात, त्यांचे त्याने पालन करावे. राजाने अर्थ आणि धर्म यांचे अनुशासन करावे. नन्दियमिराज[१९] जातककथेत राजाला उपदेश करताना

गौतम बुद्ध असे सांगतात की, राजाने दुर्गतीला नेणारी सारी कर्मे सोडून दान, शील, परित्याग, अक्रोध, क्षमा, अहिंसा, आर्जव, मार्दव, तप आणि अविरोध या दहा राजधर्मांचे पालन करावे. या उपरोक्त सर्व कर्तव्यांचे आणि राजधर्माचे पालन केल्यास राज्यसंस्था धम्मावर व नीतीवर अधिष्ठित होते असे गौतम बुद्ध सांगतात. उपरोक्त जातक कथाशिवाय आणखी बऱ्याच कथांमधून गौतम बुद्धांचे राजधर्म व राजनीती संदर्भातील राजकीय विचार प्रकट झाले आहेत.

**गौतम बुद्धांनी मांडलेले राजकारणाचे नवे प्रतिमान :**

गौतम बुद्धांनी आपल्या राजकीय विचारांद्वारे राजकारणाचे वेगळे प्रतिमान मांडले. या प्रतिमानाद्वारे त्यांनी राजकारण हे समाज उपयोगी असलेले पाहिजे व राजकारणामध्ये स्वार्थ असता कामा नये, असे दाखवून दिले. गौतम बुद्धांचे राजकारणाचे हे नवीन प्रतिमान आपणास त्यांनी ज्या दहा पारमिता सांगितल्या त्यामधील शीलपारमितामध्ये आढळून येते. गौतम बुद्धांनी जी शीलपारमिता सांगितली, त्यामध्ये त्यांनी मघाचे उदाहरण दिले आहे. हजारो वर्षापूर्वी बोधिसत्त्वाने मगधदेशामध्ये मंचल नांवाच्या गावात एका शेतकऱ्याच्या पोटी जन्म घेतलेला होता, तेव्हा त्यांचे नांव मघ होते. हा मघ जेव्हा वयामध्ये तेव्हा तो आपल्या गावातील लोकांचा स्वार्थीपणा पाहून दु:खीत होतो व स्वत: पासूनच तो गावकऱ्यांच्या सेवेस सुरूवात करतो. तो गावातील रस्ते साफ करत असे. जी गावात घाण असेल ती गावाच्या बाहेर नेवून टाकत असे. पिण्याच्या पाण्यात घाणेरडे पाणी मिसळू नये म्हणून त्यांने विहिरीस कठडा बांधला. अशा प्रकारे तो लोकोपयोगी कामे करीत होता. तेव्हा गावकरी त्याची चेष्टा करत असत. त्याला मूर्ख समजत परंतु मघाने कधी आपल्या सेवेमध्ये खंड पडू दिला नाही. तो जरी गावाची सेवा करीत होता तरी त्यांने कधी आपल्या घरच्या शेतीकडे दुर्लक्ष केले नाही. तो आपला वेळ कधीच वाया घालवत नसे.

कालांतराने गावातील दोन तरूणांनी विचार केला की, गावातील सर्व लोक जरी मघाला दोष देत असले तरी मघाच्या वर्तनावरून तरी तो चांगला दिसतो. तो कधी दारू पित नाही, चावडीवर जावून वेळ वाया घालवत नाही. तो कोणाशी कधी भांडण

करीत नाही तरीही लोक विनाकारण त्याला मूर्ख समजतात. हे चुकीचे आहे. तेव्हा आपण त्याला सामील होवून गावाची सेवा करूया व त्यालाच आपण आपला गुरू समजूया. नंतर ते मघाकडे गेले व त्यांनी आपला मनोदय मघास सांगितला, तेव्हा मघाने त्यांना जे मार्गदर्शन केले ते महत्त्वाचे ठरते, मघ त्यांना म्हणतो की, ''मित्रानों ! सदाचाराने कालाचा सद्व्यय करण्याची तुमची मनीषा वाखाण्याजोगी आहे. परंतु त्यासाठी तुम्ही माझे शिष्यत्व पत्करण्याची आवश्यकता नाही. माझ्यासारखे मर्त्य नाशवंत आहेत, हे तुम्ही जाणताच आहात. तेव्हा अशा क्षणभंगूर प्राण्याचे शिष्यत्त्व न पत्करता, आम्ही सर्वांनी धर्माचे शिष्यत्त्व पत्करालेले बरे. कारण धर्म शाश्वत आहे; तो अनादि आहे; त्याला आपल्यापासून कोणीही दूर करू शकत नाही.''

तेव्हा ते तरूण मघास म्हणतात की, आपल्या सारख्या संतावाचून आम्हास धर्माधर्माचे ज्ञान होणार नाही. आम्ही तुमच्या सोबत राहतो, आम्हाला मार्गदर्शन करा. नंतर त्यांना मघ धर्म, शील यांचे महत्त्व समजून सांगतो, तेव्हा ते दोन तरूण पंचशील तत्त्वाचे पालन करण्याचे ठरवितात. नंतर हळूहळू मघास आणखी तीस सहकारी, अनुयायी येवून मिळतात. त्या सर्वांनी मिळून जनकल्याणकारक कामे करण्याचा सपाटाच सुरू केला. त्यांनी धर्मशाळा निर्माण केली. आसपासच्या गावचे सर्व रस्ते साफ केले, ल्हानसान पूल बांधले, तलाव खोदले आणि अशीच इतर लोकोपयोगाची कामे केली. याशिवाय आपल्या परगण्यातील लोकांना पंचशील तत्त्वाचे पालन करण्याचा उपदेश केला.

वरील सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून लोकांच्यामध्ये मतपरिवर्तन घडून आले. त्यांचे मन बदलले व सर्वचजण मघाच्या मार्गाचे अनुसरण करू लागले. त्यामुळे अर्थातच लोक सदाचारी बनले, दारूची दुकाने बंद झाली. लोकांतील भांडणे मिटली गेली. त्यामुळे तेथील ग्रामभोजकाला (न्याय आणि वसुलीकामगार) दंडाच्या रूपाने मिळणारे धन बंद झाले. तेव्हा ग्रामभोजकाने स्वार्थीवृत्तीने नाराज होवून मघ व त्याचे इतर अनुयायी दरोडेखोर आहेत व त्यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी तक्रार मगधदेशाच्या राजाकडे केली. तेव्हा राजाने मघ व त्याचे इतर तीस साथीदार यांना

पकडून हत्तीच्या पायाखाली द्यावे असा हूकूम केला. ज्यावेळेस मघ व त्याचे इतर अनुयायी यांना राजांगनामध्ये पालथे पाडून त्यांच्यावर मदोन्मत हत्ती सोडण्यात आले त्यावेळेस मघाने आपल्या साथीदारांना सांगितले की, "मित्रहो, तुम्हाला असे वाटेल की, आपण आजवर सदाचारात दिवस घालविले त्यामुळेच आपल्यावर हा प्रसंग ओढवला आहे, तरी कृपया तुमच्या मनाला अशा विचाराचा स्पर्शही होवू देवू नका. कारण इहलोकी जरी आम्हाला आमच्या कर्माचे फळ मिळाले नाही तर परलोकी आपणास याचे फळ नक्कीच प्राप्त होईल. मित्रानो, इहलोकीच्या व्यवहारामध्ये माणसाला यथायोग्य न्याय मिळत नाही, हे उघड आहे. परंतु आम्ही आमच्या कर्मानी इतके बांधले गेले आहोत की, त्यांजपासून परलोकी आमची सुटका होणे शक्य नाही. तेव्हा आपली कर्मेच आपले रक्षक पोलीस न्यायाधीश होतील हे लक्षात ठेवा. या प्रसंगी तुम्ही तुमची मैत्री-भावना दृढ करा आणि ज्याप्रमाणे तुम्ही इतरावर प्रेम करीत होता, त्याचप्रमाणे तुमच्यावर फिर्याद करणाऱ्या ग्रामभोजकावर, तुम्हाला मारण्याचा हुकूम देणाऱ्या राजावर व तुम्हास मारण्यास प्रवृत्त झालेल्या हत्तीवर तुमचे प्रेम असू द्या.

मघाच्या मार्गदर्शनाप्रमाणे त्या तीस अनुयायांनी हत्तीवर, राजावर आणि ग्रामभोजकावर मैत्रीची भावना केली. त्यांना आपल्या मरणावर टपलेले शत्रू न समजता नश्वर जगातून मुक्त करणारे हितचिंतक, मित्रच समजले. त्यामुळे जेव्हा मदोन्मत हत्ती त्यांच्यावर सोडण्यात आले, तेव्हा ते त्यांच्या अंगावरून गेले नाहीत किंवा त्यांना कसलाही उपद्रव दिला नाही. ही बातमी जेव्हा राजास समजली तेव्हा प्रत्यक्ष त्यांना पाहण्यासाठी राजा घटनास्थळी आला. तेव्हा त्यांच्यावरती असा आरोप करण्यात आला की, त्यांना हत्तीचा मंत्र माहीत असला पाहिजे किंवा त्यांच्याजवळ काही औषधे असली पाहीजेत. ज्यायोगे हत्ती त्यांच्याजवळ जाण्यास धजत नाही. तेव्हा राजा त्यांना म्हणला, "तुम्हाला हत्तीचा मंत्र माहीत असला पाहिजे. नाहीतर हत्ती तुमच्या अंगावरून चालून जात नाही हे कसे." तेव्हा मघ राजास म्हणाला, महाराज आजपर्यंत आम्ही शीलाने वागत आलो आहोत. याशिवाय आम्ही यथाशक्ती लोकांची सेवा करीत आलो आहोत.

आम्ही कोणाचा घात गेला नाही ना कोणाची चोरी. आमच्यावर जेव्हा हा प्रसंग आला तेव्हा मी माझ्या मित्रांना बजावले की, आम्हाला पकडणाऱ्या ग्रामभोजकावर, मारण्याचा हूकूम देणाऱ्या राजावर, व आपणास मारणाऱ्या हत्तीवर ही मैत्रीची भावना असू द्या. त्यांचा द्वेष करून नका. आमच्या या शीलाचा आणि मैत्रीचा प्रभाव हाच काय तो आमचा मंत्र आहे.

राजाने मघाच्या व आसपासच्या गावाची खरी स्थिती काय आहे, याची माहिती आपले दूत पाठवून घेतली. त्यावेळीस त्यांना असे दिसून आले की, बोधीसत्त्व मघ व त्याच्या इतर साथीदारांनी त्या प्रांतामध्ये उत्तम सुधारणा केल्या होत्या. तेथील लोक सुखात रहात होते. ते परस्परांशी प्रेमाने वागत असत. तेथे चोऱ्या, मारामाऱ्या, फिर्यादीअर्यादी वगैरे गोष्टि होत नव्हत्या. त्यामुळे ग्रामभोजकाने स्वार्थाने मघ व त्याच्याबरोबरच्या इतर साथीदारांविरूद्ध राजाकडे तक्रार केली होती. ही माहिती ते दूत राजाला सांगतात तेव्हा राजा मघ व त्याच्या साथीदारांस मुक्त करण्याचे आदेश देतो. तर ग्रामभोजकाला खोटी फिर्याद दिल्याबद्दल फाशी देण्याचा हूकूम करतो. तेव्हा मघ महाराजास म्हणतो, ‘‘महाराज ग्रामभोजक नसता तर आम्हाला आपल्या दर्शनाचा योग आला नसता. त्यामुळे त्याला आपण जीवदान द्यावे.’’ तेव्हा बोधिसत्त्वाच्या विनंतीला मान देवून राजा ग्रामभोजकाला सोडून देतो.

उपरोक्त मघाच्या कथेतून गौतम बुद्धांनी राजकारणाचे नवे प्रतिमान निर्माण केल्याचे आपणास दिसून येते. या कथेद्वारे ते सर्वप्रथम हे दाखवून देतात की समाजाची उभारणी शील, सदाचार यावर आधारीत झाली असता समाजात कोणत्याही अनैतिक गोष्टी निर्माण होत नाहीत. माणसाने सर्वप्रथम स्वत:मध्ये बदल घडवून आणावा व स्वत: समाजोपयोगी कामे करावीत. आपण स्वत: चारित्र्याने वागावे. कालांतराने आपणाला दोष देणारेच आपल्या चांगल्या कामाचे समर्थक बनतात. तेच आपल्या समाजसेवेच्या कामामध्ये मदत करतात. तेव्हा लोकोपवादाचा मनात विचार न करता आपले कर्म करीत राहावे. जेव्हा समाज शीलवान बनतो तेव्हा त्या समाजात

चोऱ्या, मारामाऱ्या, परस्परविरोधी तक्रारी केल्या जात नाहीत. लोक व्यसनापासून दूर जातात व एक आदर्श समाज निर्माण होतो.

ज्यांना समाजकारण आणि राजकारण करावयाचे आहे. त्याने स्वार्थाने प्रेरित होवून समाजकारण किंवा राजकारण न करता केवळ जनकल्याण हाच हेतू मनामध्ये ठेवला पाहिजे. आपण सर्वप्रथम स्वत:स बदलण्यास सुरूवात केली तर हळूहळू बऱ्याच माणसांच्या मनामध्ये मतपरिवर्तन घडून ते चांगली कामे करण्यास प्रवृत्त होतात. त्याचबरोबर या कथेतून असे दिसून येते की, जेव्हा एवाद्या कामामध्ये लोकसहभाग असतो. शासनापेक्षा प्रत्यक्ष लोकांच्याच मनामध्ये परिवर्तनाची आस असते तेव्हा तो समाज आदर्श समाज बनतो. राजकारण आणि समाजकारण यामध्ये लोकांनी एकमेकाकडे द्वेषमूलक दृष्टीने न पाहता मैत्रीच्या भावनेने पाहिले पाहिजे.

**गौतम बुद्धांचा धम्मविजय आणि चक्रवती राजाची संकल्पना -**

उत्तर ऋग्वेद काळामध्ये भारतीय समाजामध्ये सांस्कृतिक व वैचारिक अंगानी विविध आंदोलने सुरू झाली. यामध्ये जैन व बौद्ध तत्त्वज्ञानांने महत्त्वाची भुमिका बजावली. भगवान गौतम बुद्धांनी आपल्या तत्त्वज्ञानाचा पाया, माणसाची दु:खापासून मुक्तता करून नैतिक व सदाचरणावरती आधारीत समाज निर्मिती करणे या उद्दिष्टावर उभारला. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी त्यांनी मानवी मुक्तीचा मार्ग, पंचशील तत्त्वे यांची निर्मिती झाली. गौतम बुद्धांनी या तत्त्वाच्या माध्यमातून दु:खाचे मूळ कारण तृष्णा हे असून प्रयत्नाअंती त्याच्यावर विजय मिळविता येतो असे सांगितले. गौतम बुद्धांनी आपल्या विचारांच्या प्रसाराकरिता आणि वैचारिक दिग्विजयार्थ देशपर्यटन केले. अशा प्रकारे वैचारिक दिग्विजयार्थ पर्यटन करण्याची प्रथा त्या काळी भारतवर्षामध्ये प्रशस्त मानली जात होती.[२०] आत्मा, ईश्वर व परलोक यांच्या सत्यत्त्वाबद्दल भवति न भवति बुद्धाच्या काळात देशभर चालली होती. हीच धर्मोदेशार्थ पर्यटन करण्याची प्रवृत्ती बुद्ध धर्मामध्ये पराकष्ठेला पोहचली. शांतीमय विचारांच्या दिग्विजयार्थ बुद्धांचे अनुयायी समुद्र व पर्वत यांना ओलांडून हजारो मैल प्रवास करीत असत.[२१] विश्वासंबंधी अंतिम सत्य सापडणे अशक्य आहे हे जाणून बुद्धांनी मनुष्याच्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाला

प्रधान स्थान दिले व बुद्धीने आणि अनुभवाने सांगता येतील अशा जीवनविषयक सत्यास त्यांनी प्राधान्य दिले. त्यांनी विश्वासंबंधीच्या प्रश्नापेक्षा प्रत्यक्ष आचरणाचा प्रश्न[२२] हाच खरा प्रश्न ठरविला व त्यासाठी आपल्या धम्मविषयक तत्त्वज्ञानाचा प्रसार साऱ्या जगभर केला. हाच त्यांचा 'धम्मविजय' ठरला. गौतम बुद्धांनी आपल्या धम्माच्या प्रसारासाठी कोणत्याही सद्‌भावना या मार्गांचा वापर केला.

**चक्रवर्ती राजा -**

गौतम बुद्धांनी चक्रवर्ती राजाची महत्त्वाची संकल्पना मांडली. ती आपणास पाली ग्रंथ दीघनिकाय अंगुत्तरनिकाय इत्यादी ठिकाणी प्रतिबिंबित झाल्याचे दिसते. चक्रवर्ती राजा महापुरूषांना आवश्यक असलेल्या बत्तीस प्रकारच्या लक्षणांनीयुक्त असतो.[२३] चक्रवर्ती राजाची संकल्पना ही प्रामुख्याने शील, सदाचार इत्यादी गुणांवर आधारलेली आहे. गणराज्यांच्याकडे वास्तववादीदृष्टीने बघत असतानाच बौद्ध धम्म उपदेशिकांनी चक्रवर्ती राजाची आदर्शवादीदृष्टीने मांडणी केली. चक्रवर्ती राजा हा उपरोक्त ठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे बत्तीस प्रकारच्या लक्षणांनीयुक्त असतो. थ्याच्रेबरोबर तो धर्माने राज्य करणार असतो. चारी समुद्राच्या सीमेप्रर्यंतच्या भूमीवर तो अधिपत्य गाजविणारा असतो.[२४] चक्रवर्ती राजा सात प्रकारच्या रत्नांनीयुक्त[२५] असतो. या सातरत्नामध्ये चक्ररत्न, हत्तीरत्न, घोडारत्न, मणीरत्न (माणिक-मोती-हिरा), स्त्रीरत्न, खजिनदाररत्न आणि सल्लागाररत्न यांचा समावेश होतो. चक्रवर्ती राजास शत्रूसेनेचा संहार करणारे असे एक हजारापेक्षा जास्त शूर व वीर पुत्र असतात. चक्रवर्ती राजा एका समुद्राच्या भूखंडापासून दुसऱ्या समुद्राच्या भूखंडावर तलवारी शिवाय केवळ धर्माने राज्य करतो.[२६] अंगुत्तरनिकायामध्ये[२७] असेही विषद करण्यात आले आहे की, चक्रवर्ती राजाबरोबरच त्याचा जेष्ठ पुत्रही पुढील पाच गुणांचा मालक असतो. १) संपत्ती २) सद्‌गुण ३) मोजमाप ४) वेळ आणि ५) एकत्रित झालेले लोक. चक्रवर्ती राजाच्या गुणांचे वर्णन करताना असेही सांगितले जाते की, तो पृथ्वीच्या चारी दिशांवर तो आपला अंमल प्रस्थापित करतो. तो शीलाने, सदाचाराने वागणारा परदेशामध्ये आनंदोत्सव साजरा करणारा, प्रामाणिकपणे राज्य करणारा असतो. तो

स्वत: कायद्याचे पालन करणारा आणि कायद्याची अंमलबजावणी करणारा असतो. त्याचबरोबर उपरोक्त सातरत्ने बाळगणारा असतो.

संपूर्ण जगावर वर्चस्व मिळवून साम्राज्य निर्माण केलेल्या दोन चक्रवर्ती राजाची उदाहरणे दीघनिकाय भाग-३ मध्ये सांगितलेली आहेत. ते दोन चक्रवर्ती राजे[२८] म्हणजे १) चक्रवर्ती महासुदस्सना व त्याचा मुलगा २) दलहानेमी होय. या ठिकाणी असे सांगितले आहे की, या राजांना एका अद्भूत आणि गंभीरपणे विनंती केली असता पुढे-पुढे जावून दक्षिण, उत्तर, पूर्व, पश्चिम या दिशांना यशस्वीपणे सामर्थ्यशाली राजेशाही आपल्या चौपदारी सैन्याच्या मदतीने निर्माण करणाऱ्या चक्राचा शोध लागला.[२९] व त्याच्या साह्याने त्यांनी आपली सत्ता प्रस्थापित करण्यास सुरूवात केली. तेव्हा अद्वितीय असे राजेही त्यांच्यापुढे शरणागती पत्करत असत. तेव्हा ते चक्रवर्ती राजे शरणागत राजांना त्यांची संपत्ती, राज्य परत करत असत व त्यांचा राज्यकारभार स्वत:च्या निरीक्षणाखाली आणि पंचशीलावर आधारीत करण्यास भाग पाडत. पराभूत राजांवर बौद्ध व्यक्तीवर जी नैतिक पंचशीलाचे बंधन आहे, तेच त्याच्यावरही लादले जात असे. ती पंचशील तत्त्वे पुढीलप्रमाणे –

१) कोणत्याही प्राणीमात्राच्या जीवितास इजा करू नये.

२) असत्य संभाषण किंवा विचारांचा पूर्ण त्याग करावा.

३) जे आपल्या मालकीचे नाही किंवा आपल्यास दिले नाही त्याची अभिलाषा धरू नये.

४) ब्रह्मचर्य तत्त्वाचे पालन करावे.

५) कोणत्याही मादक पदार्थाचे सेवन करू नये.

याच ठिकाणी चक्रवर्ती राजाची सत्ता त्याच्या प्रजेवर, राज्यावर कशी असावी याचेही वर्णन करण्यात आले आहे. चक्रवर्ती राजा महासुदस्सनाची महत्त्वाची बाजू म्हणजे तो ब्राह्मण आणि त्याच्या राज्यातील गृहस्थांना आपल्या जवळचा, पित्याप्रमाणे, मुलाप्रमाणे वाटत होता. त्याप्रमाणे त्यालाही आपल्या राज्यातील ब्राह्मण, गृहस्थ आपल्या पित्याप्रमाणे व पुत्राप्रमाणे जवळची वाटत असत.[३०]

जेव्हा आपण चक्रवर्ती दालहानेमीचा विचार करतो तेव्हा असे दिसून येते की, दालहानेमीनेही संपूर्ण जगावर, या पृथ्वीवर वर्चस्व निर्माण केले ते तलवारीच्या साह्याने नव्हे तर सदाचाराने वागून.३१ अंगुत्तरनिकायात आणकी एके ठिकाणी गौतम बुद्ध असे सांगतात की, राजा, चक्रवर्ती राजा, सदाचारी व्यक्ती यांच्यामध्ये सद्‌गुणाला, सदाचाराला जास्त महत्त्व आहे. सदाचार हाच राजाचा राजा आहे व तोच त्याचा धर्म आहे. चक्रवर्ती राजा धम्माचा आदर करतो, धम्माचे पालन करतो. त्याचबरोबर तो आपल्या राज्यातील शहरी व ग्रामीण भागातील लोकांना, क्षत्रियांना, ब्राह्मणांना, पशुपक्ष्यांनाही सदाचारावर आधारलेल्या धम्मानुसार जीवन जगण्यास मदत करतो, त्यांना त्यासाठी संरक्षण देतो. दीघनिकायातील आणखी एके ठिकाणी चक्रवर्ती राजाच्या बौद्ध संकल्पनेवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यामध्ये चक्रवर्ती राजा दालहानेमी याच्याविषयी विवेचन केले आहे. दालहानेमी जेव्हा आपल्या राजपदाचा त्याग करतो व आपल्या जेष्ठ पुत्रास, गादीवर बसवतो तेव्हा ते अलौकीक चक्र नाहीसे होते.३१ तेव्हा नव्या राजाला धर्मोपदेश_करताना एक एक परिव्राजक असे सांगतो की, ते अलौकिक चक्र काही त्याला त्याच्या पित्याकडून मिळणारा वारसा नव्हता. तु जर चक्रवर्ती म्हणून आपली आर्यन कर्तव्य पार पाडली तर पुन्हा तुला या चक्राची कार्ये तुला तुझ्या कृतीतून दिसून येतील.[३३] म्हणजेच आपल्या साम्राज्यातील सर्व लोकांवर, लष्करावर, प्रतिष्ठितांवर, सामान्य जनावर, ब्राह्मणांवर – साधुवर, पशुपक्ष्यांवर योग्यपणे नियंत्रण ठेवून त्यांना संरक्षण दिले पाहिजे. त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे वाईट कृत्य घडणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. जे गरीब असतील त्यांना संपत्ती दिली पाहिजे. ब्राह्मणांना व साधू, परिव्राजक यांना योग्य मार्गाने जाण्यास मदत केली पाहिजे. लोकांना धम्मानुसार वागण्यास प्रेरणा द्यावी. अशी कामे जर राजाने केली तर पुन्हा अलौकिक चक्राची किमया दिसू लागेल.

अशा प्रकारे ज्यांना पृथ्वीवर राज्य करावयाचे आहे त्यांनी धम्माने, सदाचाराने राज्य केले पाहिजे. चक्रवर्ती राजाच्या मनामध्ये जनतेविषयी आत्मियता, कणव असली पाहिजे. चक्रवर्ती राजाच्या संकल्पनेतून गौतम बुद्धांनी हे दाखवून दिले. जगावर वर्चस्व

बळाच्या किंवा लष्कराच्या आधारे प्रस्थापित करता येत नाही, तर त्यासाठी धम्म मार्गाचा अवलंब करावा लागेल. ज्याला संपूर्ण जगावर नियंत्रण करावयाचे आहे त्याने शीलाला, सदाचरणाला आणि आपल्या कर्तव्याला महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे. गौतम बुद्धांची धर्मविजयाची व चक्रवर्ती राजाची संकल्पना परस्परास पूरक आहे. ज्याप्रमाणे जगामध्ये आपल्या धम्माचा प्रसार करण्यासाठी लोकांवर बळजबरी केली जात नाही केवळ शांतता आणि सद्भावना या गोष्टींचा वापर केला जातो. त्याचप्रमाणे चक्रवर्ती राजा प्रजेविषयी शांतता, सद्भावना याचा वापर करून जगावर वर्चस्व प्रस्थापित करू शकतो. बळाच्या किंवा लष्कराच्या आधाराने नव्हे. गौतम बुद्धांची धम्मविजयाची व चक्रवर्ती राजाची संकल्पना 'धम्मचक्रपरिवर्तनावर' आधारीत होती.

**भगवान गौतम बुद्धांचा सेनापती सिंहाला उपदेश :**

भगवान गौतम बुद्धांनी सेनपती सिंहाला केलेला उपदेश पाहण्यापूर्वी आपणास गौतम बुद्धांना अहिंसेचा कोणता अर्थ अभिप्रेत होता हे पाहणे संयुक्तिक ठरेल. अहिंसा म्हणजे कोणत्याही प्रकारची जीवहिंसा_ न करणे. अहिंसा हा गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचा मूलभूत भाग होता. भगवान गौतम बुद्धांनी अहिंसेची व्याख्या कोठेच दिलेली नाही. ते अहिंसेचा क्वचित प्रसंगीच उल्लेख करतात. एके ठिकाणी अहिंसेचा अर्थ सांगताना गौतम बुद्ध म्हणतात की, 'तुम्ही सर्वावर प्रेम करा म्हणजेच तुम्हाला कोणाचीही हत्या करण्याची इच्छा होणार नाही.[३४] ते जीवहत्येची इच्छा व जीवहत्येची आवश्यकता यामध्ये फरक करतात. त्या ठिकाणी त्यानी त्यास प्रतिबंध केला नाही.[३५] गौतम बुद्धांचे अहिंसेविषयीचे विचार त्याच्या 'मध्यम मार्गावर'[३६] आधारलेले दिसून येतात.

गौतम बुद्धांनी सेनापती सिंहाला केलेला उपदेश हा प्रामुख्याने अहिंसेच्या तत्त्वासंदर्भातीलच आहे. एके दिवशी श्रमण महावीरांचा अनुयायी लिच्छावी सिंह सेनापती गौतम बुद्धांशी वादविवाद करतो आणि त्यांना विचारतो की, "तथागत, मी एक सैनिक आहे; आणि राज्यात कायद्याचे पालन नीट व्हावे आणि वेळप्रसंगी युद्धाची कार्यवाही करावी म्हणून राजाने मला नियुक्त केले आहे. दु:खिताबद्दल करूणा आणि

असीमित दयेची शिकवण देणाऱ्या तथागतांना गुन्हेगाराला शिक्षा करणे मान्य आहे काय?[३७] दुसरे म्हणजे, आपली घरे, बायकामुले व चीजवस्तू ह्यांचे रक्षण करण्यासाठी युद्धाचा मार्ग पत्करणे हे चूक आहे असे तथागत सांगतात काय? तसेच तथागत संपूर्ण आत्मसमर्पणाची शिकवण देतात काय की जेणेकरून अत्याचारी लोकांनी काहीही केले तरी मी सहन करावे आणि जे माझ्या मालकीचे असेल ते बळजबरीने कोणी नेत असेल तरी नेऊ द्यावे? तसेच सर्व संघर्ष मग ते न्याय करण्यासाठी असले तरी ते निषिद्ध आहेत असे तथागत मानतात काय?[३८]

या प्रश्नाचे उत्तर देताना गौतम बुद्ध म्हणतात की, एवाद्याने जर अपराध केला तर, त्याला त्याबद्दल शिक्षा ही झालीच पाहिजे. आणि जो उपकारार्ह आहे त्याला लाभ मिळालाच पाहिजे.[३९] त्याचबरोबर कोणत्याही प्राणिमात्रास अपाय करू नये. उलट त्याना प्रेमाने, दयेने वागवावे. हे दोन्ही आदेश परस्पर विरोधी आहेत, परंतु तेच बरोबर आहेत कारण एवादा अपराधी शिक्षा भोगत असतो, ते त्याच्या कुकर्माचा परिणाम म्हणून. मात्र जेव्हा न्यायाधिश शिक्षा देतो, त्यावेळेस, त्याच्या मनामध्ये द्वेष किंवा सूडबुद्धी असता कामा नये. अपराध्यानेही आपल्याला जी शिक्षा मिळाली आहे ती आपल्या कुकर्माचे फळ आहे असे मानले पाहिजे. शिक्षेमुळे आपला आत्मा शुद्ध होणार आहे असे जेव्हा त्याला वाटेल, तेव्हा त्याला आपल्या शिक्षेबद्दल, कामाबद्दल दु:ख न होता उलट तो आनंदीच होईल.

तथागत पुन्हा पुढे आपला उपदेश सतत चालू ठेवतात आणि म्हणतात, ''सर्व युद्धप्रसंग हे दु:खदायक आहेत. ज्यामध्ये मनुष्य स्वत:च्या भावालाही ठार मारण्याचा प्रयत्न करतो. परंतु असे शिकवित नाहीत की, युद्ध टाळण्याचे सर्व प्रयत्न करतो. परंतु असे शिकवित नाहीत की, युद्ध टाळण्याचे सर्व प्रयत्न करूनही, धर्माच्या बाजूने, नैतिकतेसाठी, चांगल्या कार्यासाठी जे युद्धात हिंसा करतात. त्यांचा द्वेष करावा. तर ज्या माणसाच्या कृतीमुळे युद्ध चालू झाले आहे त्यास दोष द्यावा. तथागताने संपूर्ण आत्मत्यागाची शिकवण दिली आहे परंतु; त्यांनी ज्या दुष्टशक्ती आहेत त्यांना शरण जाण्यास शिकविले नाही, मग त्या दैवी असोत, मानवनिर्मित असोत किंवा नैसर्गिक

असोत. माणसाने ~~सतत सत्य आणि नीतीमत्ता यांच्या~~ विजयासाठी, स्वतःला श्रेष्ठ, श्रीमंत बनविण्यासाठी संघर्ष करतो. त्याला कोणतेही फळ मिळणार नाही. पण जो सत्य आणि सदाचारासाठी संघर्ष करतो. त्याला फळ निश्चिंत मिळते, जो योद्धा धर्मासाठी लढाई करण्यास उतरतो, त्याने रणभूमीवर बलिदान करण्यास तयार असले पाहिजे. कारण क्षत्रिय वीरांची ती नियती असते आणि योगाने युद्धात त्यांचा मृत्यू झाला तरी तक्रार करण्याचे कारण नाही. परंतु युद्धात विजयी होणाऱ्यानेही लक्षात ठेवावे की विजय हा क्षणभंगूर असतो. परिस्थितीनुसार त्यास पराभवासही तोंड द्यावे लागते. परंतु विजयी झालेल्या योद्धयाने जर सौम्य धोरण स्वीकारले, आपल्या मनातील द्वेष भावना नष्ट केली पाहिजे आणि युद्धभूमीवर पडलेल्या विरोधकांना असे म्हटले पाहिजे की, चला आता आपण भावासारखे राहू या ! आपापसात शांतता प्रस्थापित करू या ! कोणत्याही सशस्त्र युद्धापेक्षा आणि विजयापेक्षा हा विजय जास्त समाधानकारक असतो. श्रेयस्कर आणि फलदायी ठरतो.[४०]

अशा प्रकारे भगवान गौतम बुद्धांनी सेनापती सिंहास अहिंसा ही सदासर्वकाळ योग्य नसते तर जेथे योग्य वाटते, जेथे धर्मासाठी, न्यायासाठी हिंसा करणे आवश्यक आहे तिथे ती केलीच पाहिजे. असा उपदेश केला. त्याचबरोबर कोणत्याही क्षत्रिय वीराचे कर्तव्य हे युद्ध करणे आहे. परंतु ते युद्ध स्वार्थासाठी न करता जनकल्याणासाठी करावे. रणभूमीवर लढणाऱ्या योद्धयांनी; जे युद्धात पराभूत झालेले आहेत त्यांच्याविषयी द्वेष न बाळगता, त्यांच्याशी प्रेमाने वागावे असा उपदेश केला.

**बौद्ध धम्मातील शिक्षेची संकल्पना :**

एखाद्या गुन्ह्याबद्दल गुन्हेगारास कायद्यानुसार शिक्षा देण्याचा हेतु कोणता असावा याबाबत शेकडो वर्षापासून अनेक सिद्धांत मांडण्यात आले आहेत. शिक्षेच्या पाठीमागे प्रामुख्याने तीन मुख्य उद्दिष्टे असतात. ती म्हणजे १) गुन्हेगाराला गुन्ह्याबद्दल शिक्षा करणे २) एखादा गुन्हा घडू नये यासाठी काही व्यक्तींना प्रतिबंधक शिक्षा करणे ३) गुन्हेगारास गुन्हेगारीपासून परावृत्त करणे. प्राचीन काळामध्ये 'डोळ्याच्या बदल्यात डोळा आणि दाताच्या बदल्यात दात[४१] या तत्त्वावर आधारलेल्या शिक्षा अस्तित्वात

होत्या. मात्र बौद्ध धम्मामध्ये शिक्षेच्या संदर्भात सुड उगविण्यासाची भूमिका नाकारून गुन्हेगाराला पुनर्वसनात्मक भूमिकेवर भर देण्यात आला. बौद्ध धम्माचा गुन्हेगाराला शिक्षा करण्यापेक्षा सुधारणेवर विश्वास आहे.[४२] मज्झिम निकायामधील चेत्तिय सुत्तात कोसलचा राजा प्रसेनजित मोठ्या आश्चर्याने म्हणतो की, बुद्धाने त्यांच्या शिष्यांना छडी आणि दंडुक्याच्या मदतीशिवाय शिस्त लावली.[४३] बुद्धांच्या अनुयायांना समाजाने स्वीकारलेल्या नियमांच्या विरूद्ध वर्तन केले तर आपण पडू आणि आपणाला दोष दिला जाईल असे वाटते त्यामुळे ते कोणतेही वाईट कृत्य करीत नाहीत. गौतम बुद्धांचे शिक्षेच्या संदर्भातील विचार दीघनिकायातील कूटदंतसुत्तामध्ये[४४] पद्धतशीरपणे व्यक्त झाले आहेत. याठिकाणी गौतम बुद्ध महाविजित राजाला राज्यातील दरोडेखोरांचा बंदोबस्त त्यांना देहदंड, कैदेत टाकून किंवा हद्दपारीची शिक्षा देवून होणार नाही असे सांगतात व त्यावर पर्यायी उपाय म्हणून राजास सांगतात की, राज्यात जे धान्य पिकवतात आणि गुराढोरांची वाढ करतात त्यांना धान्याचे शेतीसाठी आवश्यक असलेल्या अवजारांचे आणि बियाचे वाटप करावे, जे व्यापार करू इच्छितात त्यांना भांडवल द्यावे, जे राजदरबारात नोकरी करू इच्छितात त्यांना नोकरी द्यावी. त्यामुळे सर्व लोक आपापल्या कामात व व्यवसायात गुंतून राहतील आणि त्यामुळे राज्यातील दरोडेखोरांचा उपद्रव कमी होईल.

या ठिकाणी गौतम बुद्ध लक्षणे, परिणाम, फल यावर इलाज करण्यापेक्षा कारणावरच इलाज करणे पसंत करतात. राजाने आपल्या राज्यात सामाजिक न्यायाची प्रस्थापना आणि आर्थिक विषमता दूर केली तर राज्यात शिक्षेची आवश्यकताच राहाणार नाही असे गौतम बुद्ध कूटदंतसुत्ताच्या माध्यमातून सांगतात.

**गौतम बुद्धांचे राज्यधोरण व राज्यविकासविषयक विचार :**

गौतम बुद्धांनी महाविजीत राजाला केलेल्या उपदेशातून गौतम बुद्धांनी आपल्या अनेक ठिकाणच्या उपदेशातून असे सांगितले की, राज्याचे ध्येयधोरण हे नीतीवर आणि कायद्याच्या मान्यतेवर आधारीत असावे. जर का राजाने अधर्माने जनतेवर कर लादला तर जनता दु:खी होते व त्यातूनच राज्यात चोऱ्या, दरोडे याची निर्मिती होते.[४५] गौतम

बुद्ध सांगतात की, राजाने धनाची अपेक्षा न ठेवता चोख कारभार करावा. जनतेच्या कल्याणाचा हेतु डोळ्यासमोर ठेवून राज्यकारभार करावा. गौतम बुद्धांचे राज्याच्या विकासविषयक विचार दीघनिकायातील वर निर्देषित केलेल्या कूटदंत सुत्तामध्ये प्रतिबिंबित होतात. त्यांच्या मते, राज्याचा विकास घडवून आणण्यासाठी राजाने विविध प्रकारच्या उपाययोजना कराव्यात. यामध्ये राजाने आपल्या राज्यात जे शेती करू इच्छितात त्यांना बी-बियाणे, पाणीपुरवठा, शेतकी अवजारे यांचा पुरवठा करावा. त्याचबरोबर जे गुरा-ढोरांचे पालन करू इच्छितात अशासाठी राज्यात चाऱ्यांची निर्मिती करावी व तो त्यांच्यासाठी उपलब्ध करून द्यावा. जे व्यापार करू इच्छितात त्यांना भांडवली रक्कम द्यावी व जे नोकरी करून उपजीविका करू इच्छितात त्यांना नोकरी देवून त्यांच्या पोटापाण्याची सोय करावी. असे केल्यास राज्याच्या शेतीचे उत्पन्न वाढते. परिणामी राज्यास मोठ्या प्रमाणात कर मिळतो. सर्वांच्या हाताला काम मिळाल्यामुळे राज्यातील बेकारी दूर होते.[४६]

राजाने राज्यातील बेकारांना प्रशासकीय सेवेमध्ये सामावून घेतल्यामुळे ते सर्व लोक राजाची इमानेइबारे सेवा करतात व राज्यकारभार सुरळीत चालण्यास मदत होते.[४६] राजाने उपरोक्त सर्व सोयी-सुविधा निर्माण केल्या तर अर्थातच सर्व प्रजा आपापल्या कामामध्ये मग्न राहाते, त्यामुळे राज्यातील चोरी, दरोडे नाहीसे होतात. चोरांची व दरोडेखोरांची भीती संपल्यामुळे राजा व प्रजा सुखी बनते व देश समृद्ध आणि संपन्न होण्यास मदत होते. राजाने अधर्माने राज्य न करता ते धर्माधिष्ठित, नैतिक मूल्यावर आधारीत करावे. राजाने नेहमी प्रजाहितदक्ष असावे अशा प्रकारची मांडणी जातककथातील मणिचोर जातक, राजोवाद जातक, महाकवी जातक व चत्तीसनिपात जातक इत्यादीमधून करण्यात आली आहे.

कुटदंत सुत्तामध्ये राजा आपल्या पुरोहिताजवळ एक चिरकाल सुखकारक यज्ञ करण्याचा मनोदय व्यक्त करतो तेव्हा राजपुरोहित त्यास सांगतो की, महाराज आपल्या राज्याची सध्या असा यज्ञ करावा अशी परिस्थिती नाही. जनता चोऱ्यामाऱ्या, दरोडे यांनी त्रस्त आहे. तेव्हा तुमच्या मनामध्ये आता असा विचार येईल की, त्या

दरोडेखोरांना पकडून तुरूंगात टाकावे किंवा त्यांना फाशीची शिक्षा द्यावी परंतु; यामुळे काही फायदा होणार नाही. कारण त्यातूनही काही शिल्लक राहतील ते या प्रमाणे वागतीलच. तेव्हा राजाने उपरोक्त सर्व तरतुदी करून राज्यात सोयी-सुधारणा घडवून आणाव्यात. राजाने आपल्या पुरोहिताने सांगितलेल्या प्रमाणे सोयी-सुविधा निर्माण केल्या. गरजेप्रमाणे ज्यांना-त्यांना कर्जे दिली, इतरांना सरकारी सेवेत सामावून घेतले व थोड्याच दिवसात राज्यात परिवर्तन घडून आले. राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था सुरळीत झाली. राज्याच्या तिजोरीमध्ये मोठ्या प्रमाणात कराच्या रूपाने धन, पैसा गोळा झाला.

पुन्हा एके दिवशी महाविजित राजाने आता आपल्या राज्यात लोक सुखी झाले आहेत. तेव्हा आता महायज्ञ करण्यास काही हरकत नाही म्हणून त्यासाठी आपल्या पुरोहितास तयारी करण्यास सांगितले. पुरोहितानेही राजाच्या विनंतीस हरकत घेतली नाही, परंतु: तत्पूर्वी त्यांने राजाला या होणाऱ्या यज्ञासंबंधी मार्गदर्शन केले. पुरोहिताने या यज्ञासाठी सर्वप्रथम आपल्या जनपदात जे ग्रामीण व नागर क्षत्रिय आहेत त्यांची परवानगी घ्यावी तसेच राजाने आपल्या अमात्यापरिषद (मंत्रीमंडळ), जनपदातील सर्व क्षत्रिय, ब्राह्मण, गृहपती यांचीही परवानगी घ्यावी असा उपदेश केला. पुरोहिताच्या सल्ल्यानुसार महाविजित राजाने आपल्या जनपदातील व नागरी क्षेत्रातील सर्व क्षत्रिय, ब्राह्मण, गृहपती आणि त्याच्या मंत्रिमंडळाचीही परवानगी मिळविली. नंतर पुरोहिताने राजास यज्ञासंबंधीच्या तीन अटीचा उपदेश केला तो पुढीलप्रमाणे.

१) राजाच्या मनास या गोष्टीचा पश्चाताप होता कामा नये की, आपण या यज्ञात मोठ्या धनराशीचा अपव्यय करीत आहोत.

२) यज्ञ चालू असताना 'धनराशीचा मोठा भाग खर्च होत आहे.' असा विचार राजाने मनात आणू नये.

३) यज्ञ समाप्त झाल्यानंतरही राजाने आपण या यज्ञात मोठ्या धनराशीचा भाग खर्च केला असाही विचार मनात आणू नये.

नंतर ब्राह्मण पुरोहिताने यज्ञ सुरू होण्यापूर्वी महाविजित राजाच्या हृदयातून आमंत्रितांच्या प्रति उत्पन्न होवू शकणारे दहा प्रकारचे विप्रतिसार (चित्तविकार) दूर केले. या यज्ञामध्ये गाई, बकरे, मेंढे, डूकरे अथवा इतर कोणतेच प्राणी मारण्यात आले नाहीत. युपासाठी झाडे तोडण्यात आली नाहीत. वेदीवर पसरण्यासाठी दर्भ गवत तोडण्यात आले नाही. दास, नोकर, चाकर, मजुरांना काम करण्याबाबत कोणतीच सक्ती करण्यात आली नाही. ज्याच्या त्याच्या इच्छेनुसार ज्याने-त्याने कामे केली. त्या यज्ञात केवळ तूप, तेल, लोणी, दही, मध, गूळ एवढेच पदार्थ वापरण्यात आले. राजाने आपल्या राज्यातील ब्राह्मण, ग्रामवासी, नागरी क्षत्रिय, अमात्य, सभासद, जेष्ठ ब्राह्मण व धनवान गृहस्थ यांनी आणलेल्या भेटींचा, नजराण्यांचा स्वीकार केला नाही. उलट ज्यांना आवश्यक असेल त्यांनी आपल्याच जवळील धन, पैसा, घेवून जावे असे आवाहन केले. कारण राजाने तत्पूर्वी न्याय्य मार्गाने प्रचंड पैसा संपत्ती गोळा केली होती.

तेव्हा या उपरोक्त लोकांनी त्या नजराण्यातून राजाच्या यज्ञाच्या पूर्वेस, दक्षिणेस, पश्चिमेस आणि उत्तरेस दानयज्ञ स्थापन केले. व अनाथ, अंध, पंगू या लोकांसाठी धर्मशाळा बांधल्या व लोककल्याणाची कामे केली. कूटदंत ब्राह्मण व त्याचे इतर सहकारी यांना गौतम बुद्धांनी सांगितलेला हा यज्ञ जास्त आवडला. नंतर गौतम बुद्धांनी कूटदंत व त्याच्या सहकाऱ्यांना दानयज्ञ, विहारनिर्मितीयज्ञ, त्रिशरणयज्ञ, शिक्षापदयज्ञ, आणि शीलयज्ञ हे यज्ञाचे प्रकार समजावून सांगितले. कूटदंत ब्राह्मणांने यज्ञासाठी आणलेल्या जनावरांना सोडून दिले आणि गौतम बुद्ध व त्यांच्या भिक्षूसंघाला आपल्या घरी आमंत्रित केले.

कूटदंत सुत्ताच्या राजकीय दृष्टिकोनातून जर आपण विश्लेषण केले तर आपणास असे दिसून येते की राजाने आपल्या राज्यातील जनतेच्या हिताच्या सर्वप्रथम विचार करून आपल्या राज्याची ध्येयधोरणे निर्माण केली पाहिजेत. राज्यात कायदा सुव्यवस्था निर्माण केली पाहिजे व जे लोक या कायदा आणि सुव्यवस्थेस अडथळा आणतील त्यांना कोणत्याही प्रकारची दंडात्मक शिक्षा न करता, त्याच्या मूलभूत

गरजांची पूर्तता करून त्यांचे पुनर्वसन करावे. आपल्या राज्यामध्ये कोणतीही ध्येय-धोरणे राबविताना, कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम पार पाडतना त्या राजाने आपल्या राज्यातील ब्राह्मण, क्षत्रिय, अमात्य, वैश्य, गृहस्थ यांची सर्वप्रथम संमती मिळविणे आवश्य आहे.

**गौतम बुद्धांची नेतृत्त्वाविषयीची संकल्पना :**

गौतम बुद्धांच्या राजकीय विचारांमध्ये राज्याच्या नेतृत्त्वाला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते असे दिसून येते. गौतम बुद्धांना अभिप्रेत असलेला नेता व त्याच्याठायी आवश्यक असणारे गुण याबाबतचे त्यांचे विचार वेगवेगळ्या जातककथातून आणि राजाला केलेल्या उपदेशातून दिसून येतात. बौद्ध काळामध्ये राजा हा राज्याचा प्रमुख होता परंतू आधुनिक अर्थाने तो हूकूमशाह नव्हता किंवा त्याची निवड वंशपरंपरेने होत नव्हती.[४८] तर राजाची निवड ही त्या गणातील प्रमुखांकडून केली जात होती. अशा प्रकारची गणाधीशांकडून राजाची निवड होत असताना ते राजाच्या पात्रतेला महत्त्व देत असत. गौतम बुद्धांच्या राज्यउत्पत्तीच्या सिद्धांतामध्ये आपण पाहिलेच आहे की, लोकांनी एकत्र येवून सर्वाधिक पाठिंबा असणाऱ्या, सर्वात आकर्षक व उत्तम प्रकृतीच्या, कार्यकुशल व्यक्तीची राजा म्हणून निवड केली.[४९] गौतम बुद्धांचे नेतृत्त्वाविषयीचे गुण वट्ढकिसूकर[५०] जातककथेतही (क्र.२८३) आढळून येतात. या कथेमध्ये डुक्कर बांधव दुबळे असतात. त्यांना कोणी नेता नसतो, त्यामुळे दरदिवशी एक डुक्कर सिंहाच्या भक्ष्यस्थानी पडत असते. हे समजल्यावर त्यांच्यातील सुशिक्षित डुक्करतेथे जाऊन त्यांचे नेतृत्त्व करून सिंहाविरूद्ध लढण्यास त्यांना शिकविते. या कथेतून आपणास असे दिसून येते की, नेतृत्त्व करणाऱ्याच्या मनामध्ये दीनदुबळ्या लोकांच्याबद्दल करूणा असावी लागते. तो धैर्यवान, धाडसी, कावेबाज असावा लागतो.

गौतम बुद्धांच्या समस्त राजकीय विचारांची प्रेरणा ही 'सर्वजन सुखाय, सर्वजन हिताय'[५१] ही होती. त्यामुळे त्यांनी राज्यास उत्तम प्रशासकीय आणि राजकीय नेतृत्त्व देणाऱ्या नेत्यांची आपल्या विचारांमध्ये मांडणी केली. त्यांच्या मते, राज्यकारभार

करणारी मंडळी नीतिमान, आसक्तीविरहीत असावी. एके ठिकाणी तेसकुणजातक[५१] जातक कथेत राजाच्या अमात्यांच्याविषयी असे म्हटले आहे की, ते लफंगे, जुगारी, मद्यपी असू नयेत तर ते ज्याप्रमाणे एखादा सारथी आपल्या रथाचे रक्षण करतो, त्याप्रमाणे ते कर्तव्यदक्ष असावेत. राजा हा धर्मवंत, नीतीवान असावा कारण अशाच राजाच्या पाठीमागे प्रजा येत असते व ते अशाच राजाचे नेतृत्त्व मान्य करीत असत. राजाने परबुद्धीने कोणतेही काम करू नये. तो सदाचरणी, शीलवान असावा. नेतृत्त्व करणाऱ्याच्या अंगी दूरदर्शीपणा असावा लागतो असे 'अपण्णकजातक'[५३] कथेत (क्र.१) दिसून येते. ध्येयपूर्तीमध्ये अडथळे येऊ नयेत म्हणून कशी आखणी केली पाहिजे याचे या कथेतील व्यापारी असलेल्या बोधिसत्त्वाला ज्ञान आहेत पण समस्या निर्माण झाल्या तर त्यावर उपाय काय करायचा याचेही ज्ञान असलेले दिसून येते. म्हणजेच नेतृत्त्व करणाऱ्याच्या अंगी दूरदृष्टी असावी लागते असे गौतम बुद्ध सांगतात.

**गौतम बुद्धांचे परराष्ट्रनीती व अहिंसात्मक मार्गाने युद्ध टाळण्याविषयीचे विचार :**

गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानाचा मुलभूत गाभा हा शांतता, शील, सदाचार हा होता. त्यामुळे त्यांनी अर्थातच राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध परस्पर सहकार्यावर, शांतता, सामंजस्या मूल्यांवर आधारीत असावे असे विचार मांडले. त्याचबरोबर राष्ट्रा-राष्ट्रांनी आपापसामध्ये असलेले मतभेद मिटवून निकोप मैत्री प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करावेत अशी विचार गौतम बुद्धांनी मांडले. जेव्हा शाक्य आणि कोलिय यांच्यामध्ये रोहिणी नदीच्या पाणीवाटपावरून मतभेद निर्माण झाले. त्यावेळेस शाक्य संघाच्या सेनापतीने कोलियांच्या विरूद्ध युद्ध पुकारले. त्या युद्धास विरोध म्हणून गौतम बुद्धांनी शाक्य संघाच्या सभेमध्ये जे विचार मांडले, जे मत नोंदविले, त्यावरून आपणास गौतम बुद्धांचे परराष्ट्र संबंध व अहिंसात्मक मार्गाने युद्ध टाळण्याविषयीचे विचार आपणास समजून येतात. त्यांच्या मते, "युद्धसमस्या ही एक कलह समस्या आहे."[५४] असे कलह राज्या-राज्यात, राष्ट्रा-राष्ट्रात, माता-पुत्रात, पिता-पुत्रात, भावा-बहिणीत आणि सहकाऱ्यांमध्येही चालू असतात. राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष हा प्रसंगोत्पात असतो; परंतु वर्गा-वर्गातील संघर्ष हा शाश्वत स्वरूपाचा असतो. आणि हा संघर्ष सर्व दु:खांचे मुळ

आहे.[५५] याठिकाणी गौतम बुद्धांनी राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष, राज्या-राज्यातील संघर्ष हे कायमचे नसतात तर ते प्रसंगोत्पात असतात असे सांगितले. तेव्हा कोणतेही राष्ट्र किंवा राज्य हे एकमेकांचे कायमचे शत्रू किंवा मित्र नसतात असे गौतम बुद्ध सांगतात हे यावरून सिद्ध होते.

गौतम बुद्धांनी शाक्य संघाच्या सभेत कोलियांविरूद्ध होणाऱ्या युद्धास विरोध केला व युद्धाने कोणताही प्रश्न सुटणार नाही. युद्धाने-युद्ध वाढतच जाते, वैराने वैर वाढतच जाते. पहिल्या युद्धामध्येच दुसऱ्या युद्धाची बीजे रोवली जातात,[५६] त्यामुळे शाक्यांनी व कोलियांनी हा प्रश्न सामोपचाराने सामंजस्याने निकालात काढावा असे आवाहन केले. व त्याच्यावर एक लवाद[५७] नेमण्याची सुचना केली. या लवाद मंडळामध्ये शाक्य आणि कोलिय राज्यातील प्रत्येक दोन सदस्य आणि या चौघांनी मिळून पाचवा मनुष्य निवडावा. या पाच सदस्यांच्या लवाद मंडळाने काळजीपूर्वक चौकशी करावी व या पाच जणांनी हा कलह मिटवावा. अशी गौतम बुद्धांनी मांडणी केली. या ठिकाणी असे दिसून येते की, गौतम बुद्धांनी राष्ट्रा-राष्ट्रांनी आपले कलह परस्परांच्या साह्याने, तडजोडीने सोडवावेत. व उद्‌भविणारे युद्ध टाळावे. अशा प्रकारे जर राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्ष परस्परांच्या सामंजस्याने सुटले तर युद्ध टळली जातील. पर्यायानेच युद्धामध्ये होणारी हिंसा टळेल. वैरावर प्रेमाने मात करता येते. अशी मांडणी गौतम बुद्धांनी केली व परस्परांच्या विचारविनिमयाद्वारे उद्‌भवलेले युद्ध लवादाच्या मार्फत सोडविले जावून अहिंसक मार्गाने होणारे युद्ध टळेल असे गौतम बुद्धांना अभिप्रेत होते.

**ब ) गौतम बुद्धांचे लोकशाही गणराज्यविषयक विचार**

लोकशाही, गणराज्य शासनपद्धती ही फक्त पाश्चात्य देशांचाच वारसा आहे, पूर्वेकडील देशामध्ये हूकूमशाही शासनपद्धतीच अस्तित्त्वात होती अशी समजूत कालपरवा पर्यंत जागतिक राजकीय वर्तुळामध्ये होती. परंतु डॉ. ऱ्हीस डेव्हिडसने आपल्या "Buddhist India" मध्ये आणि डॉ. के. पी. जयस्वाल यांनी आपल्या "Hindu Polity" या ग्रंथामध्ये लोकशाही, गणराज्य हा काही फक्त पाश्चात्यांचाच वारसा नसून

प्राचीन भारतामध्येही लोकशाही, गणराज्य शासनपद्धती अस्तित्त्वात होती[५८] हे पुराव्यानिशी सिद्ध करून दाखविले. परंतु डॉ. डी. डी. कोसंबी यांच्या मते, त्या काळामध्ये याचा अभ्यास करणारा एकही विद्वान प्लेटो किंवा ॲरिस्टॉटल पैदा झाला नाही.[५९] प्राचीन भारताच्या राजकीय इतिहासाला गणराज्यांचा जो वारसा मिळाला तो अत्यंत महत्त्वाचा आणि वैभवशाली आहे. प्राचीन भारतामध्ये वैदिक साहित्य, जैन साहित्य आणि बौद्ध साहित्य यामध्ये गणराज्यांचा उल्लेख आढळून येतो. बौद्ध साहित्यामध्ये गणराज्याविषयी सखोल आणि विस्तृत मांडणी केल्याचे दिसून येते.

स्वत: गौतम बुद्धांनी गणराज्य शासनपद्धतीचे समर्थन केले व तिला पाठींबा दिला. गौतम बुद्धांच्या कालखंडामध्ये तत्कालिन राज्यपद्धतीमध्ये अमुलाग्र बदल घडून येत होता व महाजनपदाचे रूपांतर विशाल साम्राज्यामध्ये गडून येत होत. अशा वेळी गौतम बुद्धांनी गणराज्याविषयी विचार मांडले ते महत्त्वाचे आहेत.

**प्राचीन भारतीय गणराज्याचे स्वरूप -**

प्राचीन भारतामध्ये लोकशाही तत्त्वावर आधारलेल्या गणराज्य शासनपद्धतीचा मोठ्या प्रमाणात विकास झाला होता. प्राचीन भारतीय गणराज्यांना 'गणसंघ'[५८] असेही संबोधले जाते. गणराज्य हा शब्द मराठी भाषेमध्ये वापरला जातो. राजाशिवाय चालविल्या जाणाऱ्या किंवा स्थूलअर्थाने जनमानसानुसार, लोकनियंत्रणाखाली असणाऱ्या शासनपद्धतीस गणराज्य असे म्हणतात.[६०] या गणराज्यामध्ये सत्ता एका व्यक्तीऐवजी अनेक व्यक्तीकडे किंवा व्यक्तीसमुहाकडे होती. प्राचीन भारतात अशा गणराज्याच्या संदर्भात 'गण' व 'संघ' अशा दोन समानअर्थी संज्ञा वापरल्या जात असत. डॉ. फ्लीट या पाश्चात्य विद्वानाच्या मते, 'गण' ही संज्ञा जमात (tribe) या अर्थाने वापरली जात होती.[६१] परंतु भारतीय विचारवंताना हा अर्थ मान्य नाही. डॉ. जयस्वाल यांनी गण व संघ या दोन्ही संकल्पना राज्यासंदर्भातच वापरल्या जात होत्या असे सिद्ध करून दाखविले आहे.[६२] गौतम बुद्धांच्या काळात काही व्यापाऱ्यांना दक्षिणेतील एका राजाने त्यांचे नांव, गाव विचारल्यावर त्यातील काही जण राजेशाहीतील प्रजानन आहेत, तर काही गणातील आहेत असे उत्तर दिल्याचा संदर्भ अवदानशतक नावाच्या जैनग्रंथामध्ये

मिळतो.[६३] आचारांगसूत्र या जैन धर्मग्रंथातही भिक्षूंना 'राजाविरहित राज्यात' व 'गणराज्यात' जाण्यास मनाई केली आहे.[६४] जयस्वाल यांच्या मते, गण या शब्दाचा मुळ अर्थ संख्या असा असावा. गौतम बुद्धांनी भिक्षूंची संख्या गणमार्गाने (त्यांच्या मतपत्रिका मोजून) मोजावी असे सांगितले आहे. यावरूनच सभेस किमान सदस्य संख्या (quorum) हजर आहे किंवा नाही हे पाहणाऱ्या अधिकाऱ्यास 'गणपूरक'[६५] असे म्हणतात. यातूनच गण याचा अर्थ सभा असा ही लावू जावू लागला. व अशा सभेकडून जेथे राज्य चालविले जाते त्यास 'गणराज्य' म्हणण्याचा प्रघात पडला असावा.[६६] पाणिनीने 'संघ' ही संज्ञा गण या अर्थीच वापरली असावी. बौद्ध साहित्यातही या दोन्ही संज्ञा समान अर्थीच वापरलेल्या दिसतात. संघ ही संज्ञा राज्यासाठी, तर गण ही संज्ञा शासन प्रकारासाठी वापरली जात असावी असे जयस्वलांना वाटते.[६७]

पाणिनीने प्राचीन भारतीय गणराज्याचे 'आयुधजीविसंघ' आणि 'राजशब्दोपजीवीसंघ' असे गणराज्ये असे दोन प्रकार सांगितले आहेत तर कौटिल्याने आपल्या अर्थशास्त्रात प्राचीन भारतीय गणराज्यांच १) वार्ताशस्त्रोपजीवी व २) राजशब्दोपजीवी अशा दोन गटामध्ये वर्गीकरण केले आहे.[६८] पाणिनीने आपल्या ग्रंथामध्ये प्राचीन भारतातील वृक, दमणी, भिगर्तषष्ठ, यौधेय, पार्श्व, वज्जी, राजन्य, अंधक-वृष्णी, महाराज व भग्ग या गणराज्यांचा उल्लेख केला आहे. याशिवाय प्राचीन भारतात मद्र, कंठ, क्षुद्रक, मालव या गणराज्यांच्या अस्वित्त्वाचा उल्लेख आढळतो, मालव गणराज्याशेजारी शिबो व अंबस्य ही गणराज्ये होती. अग्रश्रेणी, क्षत्रिय, वसाती, मुचूकर्ण, ब्राह्मणक, पटल या गणराज्यांचाही ग्रीक लेखकांनी उल्लेख केला आहे. महाभारतामध्ये अंधक-वृष्णी, यादव, कुक्कुर, भोज या गणराज्यांनी श्रीकृष्णाचे नेतृत्त्व मान्य केल्याचे दिसून येते. बौद्ध व जैन वाङ्‌मयामधूनही बिहार व उत्तरप्रदेशातील प्राचीन भारतीय गणराज्यांची माहिती मिळते. यापैकी भग्ग, बुली, पिप्पलीवन राजधानी असलेले भोरिय व रामग्राम येथील कोलिय ही गणराज्ये फारच लहान होती. परंतु

शाक्य, मल्ल, लिच्छवी, विदेह ही बरीच मोठी गणराज्ये होती. प्राचीन भारतीय उपरोक्त सर्व गणराज्यामध्ये लिच्छवी आणि शाक्य गणराज्याला महत्त्वाचे स्थान आहे.

या गणराज्यामध्ये कोणती शासनपद्धती होती, यावरून विचारवंतामध्ये मतभेद आहेत व त्याविषयी निश्चित अशी माहितीही उपलब्ध नाही. परंतु सर्व गणराज्यांचा अभ्यास केला असता निष्कर्षाअंती आपण असे म्हणू शकतो की, प्राचीन भारतात १) महाजनशाही आणि २) लोकशाही असे शासनपद्धतीचे दोन प्रकार होते. काही राजशब्दोपजीवी गणराज्यामध्ये अल्पजनसत्ता अस्तित्त्वात असण्याची शक्यता होती. तेथील सत्ता काही उमराव घराण्यातील लोकांच्या हाती होती. आयुधजीव गणराज्याविषयी आपणाकडे काही माहिती उपलब्ध नाही. परंतु असे दिसून येते की, ते अधिक लोकाहितवादी होते व व्यापार, शेती आणि युद्धाच्या आधारे ते सुरक्षित जीवन जगत होते.[६९] शाक्य, कोलिय, मोरिय या गणराज्यातील राज्यकर्ते व सभासद राजधानीत राहात असत. सभासदांना 'राजे' व त्यांच्या मुलांना 'उपराजे' म्हणत.[६९] प्राचीन भारतामध्ये गणराज्य शासनपद्धतीचा व राज्यपद्धतीचा विकास झाला परंतु त्यासंबंधी त्या-त्या काळामध्ये विस्तृतपणे अभ्यास घडून आला नाही. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ अशा गणराज्यांच्या प्रमुख शाखा होत्या.

**गौतम बुद्ध, प्राचीन भारतीय गणराज्ये आणि लोकशाही -**

गौतम बुद्धांचा जन्म शाक्य गणराज्यामध्ये झाला. गौतम बुद्धांनी स्वत: शाक्यसंघाच्या राज्यकारभारामध्ये भाग घेतला. त्यामध्ये त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सिद्धार्थ गौतम बुद्ध हे शाक्य संघाचे एक जबाबदार, एकनिष्ठ व बाणेदार असे सभासद होते. ते स्वत:च्या खाजगी कामात जेवढे लक्ष देत असत तेवढेच लक्ष ते शाक्यसंघाच्या कारभारामध्ये देत होते.[७१] शाक्य गणराज्य लोकशाही मूल्यावर आधारीत होते. त्यामुळे अर्थातच गौतम बुद्धांची जडण-घडण लोकशाही मूल्यावर आधारीत झाली. गौतम बुद्धांनी लोकशाही मार्गाचा स्वीकार केला. गौतम बुद्धांनी आपल्या राज्यउत्पत्तीच्या सिद्धांतामध्ये लोकशाहीला महत्त्वाचे स्थान दिले. त्यांनी राज्याच्या दैवी उत्पत्तीचा सिद्धांत नाकारला व राज्य हे मानवनिर्मित असून माणसांनी एकत्र येवून

परस्परामध्ये करार करून सर्व-संमतीने त्याची निर्मिती केली आहे असा सिद्धांत मांडला.[७२] राज्याची निर्मिती झाल्यानंतर सर्वानुमते एका व्यक्तीची नेता म्हणून निवड केली त्यास 'महासम्मत' असे म्हणत.[७३] महासम्मताच्या निवडीतून गौतम बुद्धांनी लोकशाही मूल्यास महत्त्वाचे स्थान मिळवून दिले. गौतम बुद्धांच्या कालखंडामध्ये अस्तित्त्वात असलेली प्राचीन भारतीय गणराज्ये, शाक्यसंघ इत्यादी लोकशाही तत्त्वावर आधारीत असलेल्या संस्था आणि विचारांचा गौतम बुद्धांवर प्रभाव पडला व त्यामुळेच त्यांनी लोकशाही मार्गावर आधारीत असलेल्या धम्मसंघाची निर्मिती केली. गौतम बुद्धांचे लोकशाहीविषयक विचार आपणास उलूक जातक कथेत ज्यावेळी राजाची निवड केली जाते त्यावेळेस सर्वांच्या मताला समान मूल्य असल्याचे दिसून येते व सर्व सभासदांच्या मताचे समान मूल्य असणे हे लोकशाहीचे मुलभूत तत्त्व आहे व या कथेमधून आपणास असे दिसून येते की सर्व निर्णय सर्वानुमते घेतले जात असत.

गौतम बुद्धांनी जेव्हा शाक्य संघामध्ये कोलिय व शाक्य यांच्यामध्ये पाणीवाटप प्रश्नावरून संघर्ष उभा राहीला तेव्हा त्यांनी बहुमताचा आदर करून आपला पराभव पत्करला यावरूनच गौतम बुद्ध लोकाहीचे पुरस्कर्ते होते असे दिसून येते. गौतम बुद्धांनी आपल्या धम्मसंघाची स्थापना ही लोकशाही तत्त्वावर केली. गौतम बुद्धांनी लोकशाही गणराज्याचा पुरस्कार केला. त्यांना पाठिंबा दिला. गौतम बुद्धांनी अनेक राज्यप्रमुखांना केलेल्या उपदेशातून असे दिसून येते की, गणराज्य प्रमुखांनी लोकांना विश्वासात घेवून राज्यकारभार करावा. गौतम बुद्धांनी लोकशाही तत्त्वाला आपल्या जीवनामध्ये महत्त्वाचे स्थान दिले.

**गौतम बुद्ध आणि त्यांचा धम्मसंघ -**

गौतम बुद्धांनी आपल्या ज्ञानमार्गाचा उपदेश लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी बौद्ध भिख्खूंची एक संघटना स्थापन केली. तिला 'धम्मसंघ' असे संबोधले जाते. बौद्ध धम्मसंघाचा प्रारंभ प्रामुख्याने पंचवर्गीय भिख्खुंपासून होतो. बौद्ध धर्माच्या त्रिरत्नांमध्ये धम्मसंघाचा समावेश केला जातो. गौतम बुद्ध, धम्म आणि संघ ही ती तीन रत्ने होत. पंचवर्गीय भिख्खूंपासून धम्मसंघांचा प्रारंभ होत असला तरी श्रेष्ठिपुत्र यश हाच

संघामध्ये प्रवेश करणारा ठरतो. कारण पंचवर्गीय भिख्खूंना धम्मविवेचन करतानाही बुद्धांची संघ स्थापण्याची कल्पना होती असे दिसून येत नाही. तर श्रेष्ठीपुत्र यश यांनीच प्रथम तीन रत्नांचा आश्रय घेतला. तेच पहिले 'तेवचिक' ठरतात. कश्यपबंधूंनी त्यांच्या शिष्यांसह घेतलेल्या बौद्ध धम्माच्या दीक्षेनंतर मात्र खरा संघ अस्तित्वात आला. गौतम बुद्धांच्या संघामध्ये कोणालाही प्रवेश मिळत असे. त्यासाठी कोणतीही जातीबंधने नव्हती. संघामध्ये पुरूषांबरोबरच स्त्रीयांनाही स्थान होते. संघप्रवेशासाठी कोणत्याही सामाजिक प्रतिष्ठेची आवश्यकता नव्हती. सर्वांना समान दर्जा होता. धम्मसंघामध्ये व्यक्तीचे महत्व त्याच्या गुणांवरून ठरवले जात असे. गौतम बुद्धांच्या मते, धम्मसंघ हा एक विशाल महासागर असून भिक्खू म्हणजे या महासागराला येवून मिळणाऱ्या नद्या आहेत. वेगवेगळ्या प्रकारची नावे धारण करून सर्व नद्या सागराला येवून मिळतात व त्या सागराशी एकरूप होऊन जातात अगदी त्याप्रमाणेच संघामध्ये एवाद्या व्यक्तीने प्रवेश घेतला की तो संघाशी एकरूप होवून जातो. धम्मसंघामध्ये भिक्खूंचा संघ आणि भिक्खूणींचा संघ वेगळा होता व तेवढाच आणि तो एकमेव भेद होता. संघातील वीस वर्षाखालील व्यक्तीस भिक्खू असे संबोधले जाई. धम्मसंघामध्ये शीलाला अत्यंत महत्वाचे स्थान होते.

धम्मसंघाचे निर्माण केलेले काही नियम होते. व त्या नियमानुसार प्रत्येक भिक्खूस वर्तन करावे लागत असे. जो नियमबाह्य वर्तन करील त्यास दंड दिला जात असे. बौद्ध धर्मसंघाबद्धलचे नियम व ते मोडल्यास करावयाच्या शिक्षेसंदर्भातील तरतुदी विनयपिटकातील चुल्लवग्गामध्ये व चुल्लवग्गाच्या कम्मक्खनधकामध्ये आढळून येतात.

**धम्मसंघाची घटना व अंतर्गत कार्यपद्धती -**

धम्मसंघाची घटना व अंतर्गत कामकाजाची पद्धत ही लोकशाही तत्वावर आधारलेली होती. धम्मसंघाची स्वतंत्र अशी नियमावली होती. त्यास विनय असेही म्हणत असत. धम्मसंघाची निर्मिती ही समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यानुसार झाली होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्या २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी झालेल्या संविधान सभेच्या समारोपाच्या भाषणामध्ये म्हणतात की, "भारताला संसद

किंवा संसदीय प्रणाली माहित नव्हती असे नाही. बौद्ध भिक्खू संघाच्या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, त्यावेळी केवळ संसदच होती असे नव्हे... संघ हे दुसरे काही नसून संसदच होते... तर आधुनिक काळाला परिचित असलेल्या संसदीय कार्यप्रणालीचे सर्व नियम संघाला माहित होते. आणि त्यांचे ते पालन करीत होते. बसण्याच्या व्यवस्था विधेयक मांडण्याचे नियम, ठराव, कामकाजासाठी आवश्यक असलेली किमान संख्या, पक्ष प्रतोदाने आदेश काढणे, मतमोजणी, मतपत्रिकेद्वारे मतदान करणे, कपात सुचना, नियमितता, न्यायव्यवस्था इत्यादिबाबत त्यांच्याजवळ नियम होते. संसदेच्या कामकाजाचे हे नियम बुद्धाने संघाच्या सभेसाठी उपयोगात आणले असले, तरी देशात त्याकाळी कार्यरत असलेल्या राजकीय विधीमंडळाच्या नियमावलीतूनच त्यांनी स्वीकारले असले पाहिजेत.[८१]

डॉ. आंबेडकरांच्या वरील मतावरून आपणास हे स्पष्ट दिसून येते की, प्राचीन भारतामध्ये गणराज्यव्यवस्था अस्तित्त्वात होती. ती लोकशाहीवर आधारीत होती व या तत्कालीन राज्यपद्धतीचा गौतम बुद्धांच्या धम्मसंघावर प्रभाव पडला होता. बौद्ध भिक्षूसंघाच्या अंतर्गत कामकाजाकडे दृष्टी टाकल्यास आपणास असे दिसून येते की, बौद्ध संघाचे कामकाज सर्वसंमत्तीने चालविले जात होते. धम्मसंघाच्या कामकाजासंदर्भात कोणाही एका व्यक्तीला सर्वाधिकार नव्हते.[८२] धम्मसंघामध्ये कोणाही विशिष्ट व्यक्तीला आध्यात्मिक बाबतीतील आचार्य किंवा गणधर या नात्याने विशिष्ट उच्च स्थान नव्हते. धम्मसंघाचा जस-जसा विस्तार वाढला, तस-तसे संघाचे वेगवेगळे गट पडले व ते वेगवेगळ्या आवासात राहू लागले. या प्राचीन आवासाचे स्वरूप बौद्ध वसाहतीक होते व त्यांचे कामकाज लोकशाही गणराज्यपद्धतीनुसार चालत असे.[८३] संघात राहण्यास योग्य असलेली प्रत्येक व्यक्ती संघाच्या कामकाजामध्ये भाग घेवू शकत असे. संघाशी संबंधित असलेला कोणताही व्यवहार 'संघकम्मं'[८४] म्हणून ओळखला जाई. संघकम्माच्या व्यवहारासाठी सर्व सदस्यांनी हजर राहणे बंधनकारक होते. ज्यांना उपस्थित राहणे शक्य नसे, त्यांना आपल्या प्रतिनिधीच्यामार्फत अनुमती मागावी लागत असे.[८५]

निरनिराळ्या संघकम्मासाठी आवश्यक असणारी गणपूर्ती सदस्यसंख्या पुढीलप्रमाणे-[८६]

१) उपसंपदा, पवारणा आणि अब्भान याखेरीज इतर संघकम्मासाठी चार;

२) सीमेवरील प्रांतामधील उपसंपदा आणि एरवी अब्भान ह्यांच्याखेरीज संघकम्मांसाठी पाच;

३) अब्भान सोडून इतर संघकम्मांसाठी दहा;

४) सर्व संघकम्मासाठी वीस अथवा वीसपेक्षा अधिक केवळ गणसंख्या पूर्ण करायची आहे म्हणून अयोग्य व्यक्तीस बोलावू नये असा दंडक होता. संघकम्मासंदर्भात मतभेद निर्माण झाल्यास सर्वानुमते ते मिटविले जात असत, परंतु हे मतभेद मिटविणे अशक्य असे तेव्हा ते संघकम्म बाद ठरविले जाई व पुनश्च दुसऱ्या एखाद्या सभेत 'किच्चाधिकरणाच्या'[८७] योगे ते मांडले जाई व चर्चिले जाई. एखाद्या सदस्यावरील आरोप सिद्ध झाल्यास त्याला पदावरून काढून टाकण्याचा अधिकार संघास असे. धम्मसंघाच्या अंतर्गत कामकाजा संदर्भात काही अधिकाऱ्यांचा उल्लेख मज्जिमनिकायामध्ये आढळून येतो. जो भिक्खू पातिमोक्ख नियमांचे पठण करण्यासाठी निर्वाचित केला जाई, तो त्या काळापुरता संघप्रमुख मानला जाई.[८८] भत्तुद्देसक हा अन्न वाटपाचा अधिकारी होता. 'नवकर्मिक' हा अधिकारी नवीन बांधकाम किंवा जुन्या विहाराची दुरूस्ती यासाठी नियुक्त केला जात असे. 'भाजनक' हा भांड्याची देखभाल व वाटे करणार अधिकारी असावा.[८९] विनय चुल्लुवग्गामध्ये १) भण्डागारिक २) कप्पिय कारक ३) संघभत्तउद्देसक ४) चीवरभाजक ५) यागुभाजक ६) फलभाजक ७) खज्जकभाजक ८) सेनासन ९) चीवर पटिग्गाहक १०) साटिय-गाहापक ११) पत्त गाहापक १२) अप्पमत्तक-विस्सज्जक १३) नवकम्मिक १४) आरामिक-पेसक १५) सामणेर-पेसक या काही संघअधिकाऱ्यांची नावे आढळतात.[९०] विनयपिटकाखेरीज इतरही काही

ठिकाणी १६) पानीय, १७) भाजन-वारिक, १८) उपधिवार १९) परिसंद-वारिक २०) मुंडसयनासन-वारिक या अधिकाऱ्यांचा उल्लेख सापडतो.[९१]

भिक्षूसंघाचे जीवन नियमितपणे आणि सुरळीतपणे चालण्यासाठी काही नियमांचीही निर्मिती करण्यात आली होती. अशा नियमांची कल्पना महापरिनिब्बानसुत्तावरून येऊ शकते. या नियमाप्रमाणे भिक्षूंनी सदैव कर्मात रंगून राहू नये; कोणत्याही विषयासंबधी मनामध्ये आसक्ती ठेवू नये, निद्रेत गुंग होवून राहू नये. आमोदात अनुरक्त होवू नये, पापेच्छेला वश होवू नये व पापी, दुष्ट लोकांची संगत ठेवून नये. इत्यादींचा समावेश होतो.[९२] उपरोक्त नियमाखेरीज काही सर्वसाधारण नियमांचीही निर्मिती करण्यात आली होती. बौद्ध धम्मसंघामध्ये अपराध करणाऱ्यांना शिक्षेची सुद्धा तरतुद केली होती. चुल्लवग्गाच्या कम्मक्खन्धकामध्ये शिक्षेचे पुढील प्रकार दिले आहेत.[९३]

१) तज्जिनिय कम्म – दोष देणे.

२) निस्साय कम्म – खालचा दर्जा देणे.

३) पीब्बजानिय कम्म – हद्दपार करणे.

४) पटिसरनिय कम्म – सलोखा करणे.

५) उक्खेपनिय कम्म – तात्पुरती बंदी करणे.

उपरोक्त धम्मसंघाच्या अंतर्गत कामकाजाचे परिशीलन केले असता आपल्या असे लक्षात येते की, धम्मसंघाची घटनानिर्मिती सखोल विचारांती तयार केली होती. धम्मसंघाचा कार्यकारी मंडळ, कायदेमडळ, न्यायमंडळ या अनुषंगाने विकास झाला होता. धम्मसंघाची कामकाज पद्धत लोकशाही तत्त्वावर आधारलेली होती शिवाय धम्मसंघामध्ये प्रशासकीय विभागाचाही विकास झाला होता. बौद्ध संघाचे कार्य व निर्णयपद्धती गणराज्याच्या नमुन्यावर आधारलेली होती. संघाच्या सभेत गणपूर्ती पाहणाऱ्या अधिकाऱ्यास गणपुरक तर आपापल्या पक्षानुसार सभासदांच्या आसनाची मांडणी करणाऱ्या अधिकाऱ्याला 'ज्ञाप्ती'[९४] असे म्हणत. सभेपुढील प्रस्तावास 'कर्मवाचा', ते जाहीर करणाऱ्यास 'अनुश्रावण' अशा संज्ञा होत्या व ठरावाचे स्वरूप

असे होवू दे असे राही. ठरावाच्यावेळी संघमुख्य ठरावावर नियंत्रण ठेवत असे. तोच सभेचे अध्यक्षपद भूषवित असे. ठरावाच्या बाजूचे लोक मौन पाळत असत तर विरोधक प्रस्तावावर टीका करीत.[९५] धम्मसंघामध्ये मतदानाच्या तीन पद्धती होत्या. १) गुप्त मतदान पद्धत (गुल्हक) २) हलक्या आवाजातील (सकन्न जपक) व ३) उघड (विवातकम्) मतदानपद्धत यांचा समावेश होतो. यापैकी कोणती पद्धती वापरावी हे 'शलाकग्राहक' (सभापती) ठरवत असे.[९६] यावरून हे सिद्ध होते की बौद्ध धम्मसंघाची सभा ही आधुनिक संसदेप्रमाणेच होते.

भगवान गौतम बुद्धांनी धम्मसंघाची स्थापना केली. त्याच्या कामकाजासंदर्भात नियम बनविले. त्याचबरोबर धम्मसंघात प्रशासकीय यंत्रणाही निर्माण केली. धम्मसंघाची कामकाजपद्धती आधुनिक लोकशाही संसदीयशासनपद्धती प्रमाणेच होती. म्हणजेच गौतम बुद्धांनी लोकशाहीचा पुरस्कार तर केलाच शिवाय तिची अंमलबजावणी करणारी राजकीय व प्रशासकीय यंत्रणाही निर्माण केली असे दिसून येते.

**गौतम बुद्धांचा लिच्छवी गणास उपदेश -**

प्राचीन भारतामध्ये ज्याप्रमाणे गणराज्ये अस्तित्त्वात होती, त्याचबरोबर राजेशाही अस्तित्त्वात होती. या राज्यामध्ये वारंवार लढाया होत असत. हे राजे आपापसामध्ये लढत असत व त्याचबरोबर तत्कालिन गणराज्यांवरही आक्रमणे करून ती ताब्यात घेत असत. गणराज्याअंतर्गत यादवी निर्माण करीत असत. अशाचप्रकारे लिच्छवी गणराज्यास ताब्यात घेण्यासाठी मगधराजा अजातशत्रू टपलेला होता. तेव्हा वैशाली येथे गौतम बुद्ध वस्तीला असताना लिच्छवी गणराज्याचे प्रमुख त्यांच्याकडे आले व त्यांनी वरील परिस्थितीतून कशाप्रकारे मार्ग काढावा यासंबंधी गौतम बुद्धांकडे विचारणा केली. तेव्हा गौतम बुद्धांनी लिच्छवी गणास त्याचे कल्याण होईल व अजातशत्रूकडून पराभव होणार नाही. असा मार्ग उपदेशिला. त्यास 'अपरिहानीय धर्म' असे म्हणतात.[९७] अपरिहानीय म्हणजे विनाश टाळणार धर्म. भगवान गौतम बुद्धांनी पुढील सात मुद्दे लिच्छवी गणास लक्षात ठेवण्यास सांगितले.[९८]

१) लिच्छवी आणि वज्जी यांनी पुन्हा-पुन्हा परिषदा भरवाव्या.

२) जोपर्यंत परिषदेमध्ये एकमत व ऐक्य राहील तोपर्यंत कार्ये एकमताने व ऐक्याने पार पडतील.

३) प्रथम ठरविलेल्या नियमाच्या विरूद्ध दुसरे नियम करू नयेत.

४) राज्यातील ज्येष्ठ व वृद्ध लोकांच्याविषयी पूज्यबुद्धी असावी.

५) कुलस्त्रिया किंवा वनिता यांच्यावर कोणतीही जबरदस्ती करू नका.

६) स्वत:च्या धर्मस्थानांबद्दल किंवा पवित्र स्थानांबद्दल जो व्यय किंवा दानधर्म ठरला असेल, त्याच्यात काटछाट करता कामा नये.

७) संतांची सेवा नीट रीतीने होईल; त्यांना राज्यात सुखासमाधानाने राहता येईल अशी व्यवस्था करा. हे उपरोक्त सात नियम जोपर्यंत पाळले जातील तोपर्यंत वज्जींची अभिवृद्धी होईल, अवनती होणार नाही. शेवटी गौतम बुद्ध लिच्छवींना असा इशारा देतात की, माराचा म्हणजे पापाचा प्रभाव होवून तुमच्यात छिद्र निर्माण होईल व अजातशत्रू या छिद्रातून प्रवेश करील व गणराज्याचा घात होईल

**गौतम बुद्ध आणि शाक्य गणराज्य -**

गौतम बुद्धांचा जन्म शाक्य गणराज्यामध्ये झाला होता. गौतम बुद्धांच्या जीवनामध्ये शाक्य गणराज्यास महत्त्वाचे स्थान आहे. शाक्य गणराज्य हे प्राचीन भारतीय गणराज्यातील एक महत्त्वाचे गणराज्य म्हणून ओळखले जात होते. शाक्य गणराज्य हे एक शाक्य लोकांचे महाजनसत्ताक राज्य होते. शाक्य गणराज्याच्या भौगोलिक परिसीमा आपल्या प्रस्तुत प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये पाहिल्याच आहेत. राजपुत्र गौतमाचा शाक्य गणराज्यामधील प्रवेश ही एक महत्त्वाची घटना होती. शाक्य गणराज्याचे वर्णन व्हिस डेव्हिडसन यांनी उत्तम पद्धतीने केले आहे. शाक्यांचा एक संघ होता. डेव्हिडसन यांच्या मते, "या राज्यातील प्रशासकीय व न्यायविषयक कार्य सभेकडून पार पाडले जात असे. लहान थोर सर्वच यासाठी संथागारमध्ये हजर राहत असत. प्रसेनजितच्या सुचनेचा या सभेतच विचार करण्यात आला होता. गौतम बुद्धांच्या निर्वाणाची बातमी घेवून त्यांचा शिष्य आनंद याच सभेत आला होता.

राज्याचा व या सभेचा प्रमुख निवडला जात असे त्यास राजा असे म्हणत. एका प्रसंगी भद्दीय व शुध्दोदन हा राजा असल्याचा उल्लेख आहे.[९९] या बाबतीत डॉ. आंबेडकर आणि डेव्हिडसन यांच्या मांडणीमध्ये काही फरक जाणवतो. तो म्हणजे डॉ. आंबेडकर व इतर सर्वच विचारवंताच्या मते, शाक्य संघाच्या सभेमध्ये वीस वर्षे वय पूर्ण झालेले तरूणच शाक्य संघाची दीक्षा घेवून संघाच्या सभानां हजर राहात असत. तर राईस डेव्हिडस असे सांगतात की, लहान-थोर असे सर्वच लोक संथागारमध्ये हजर असत. शाक्य संघाच्या सभागृहाला 'संथागार'[१००] असे म्हणत व ते कपिलवस्तु नगरात होते. ज्याच्या वयाची वीस वर्षे पूर्ण झाली आहेत त्या शाक्य तरूणांना संघाची दीक्षा दिली जात असे.

शाक्य संघाची दीक्षा देतानाही एक विशिष्ठ अशा प्रकारची तरतुद करण्यात आली होती. एखाद्या तरूणाला दीक्षा देण्यापूर्वी संघाचा सेनापती त्या तरूणाच्या पात्रता तपासून पाहत असे व तो पात्र असल्याचे सिद्ध झाल्यास सभागृहामध्ये ठराव मांडत असे. या ठरावाच्या विरूद्ध मत मांडण्याचा अधिकार सर्व सदस्यांना होता. सेनापती आपला ठराव तीन वेळा पुकारत असे व तिसऱ्यावेळीही कोणी त्यावर आक्षेप घेतला नाही अथवा विरोधात मत नोंदविले नाही तर तो मंजूर समजला जाई.[१०१] गौतम बुद्धांचीही अशाच प्रकारे शाक्यसंघामध्ये निवड करण्यात आली आहे. जातककथा उलूकमध्ये पक्षांनी जो राजा निवडीचा प्रस्ताव मांडला होता. त्याची आपणास याठिकाणी आठवण होते. शाक्य संघाच्या सर्व सदस्यांना संघाच्या सर्व नियमांचे व ठरावांचे पालन करणे बंधनकारक होते. शाक्य संघाच्या सदस्यांना पुढील कर्तव्ये[१०२] पार पाडावी लागत असत.

१) संघाच्या हितसंबंधाचे संरक्षण तनमनधनपूर्वक केले पाहिजे.

२) संघाच्या सर्व सभांना हजर राहावे.

३) कोणत्याही शाक्याच्या वर्तनामध्ये एखादा दोष आढळून आल्यास त्याची मनामध्ये भीती अथवा भीड न बाळगता बोलून दाखविला पाहिजे.

४) एखाद्या सदस्यावर दोषारोप ठेवला असल्यास रागाला न जाता अपराधी असल्यास आपला गुन्हा कबूल करावा. अथवा निरपराध असल्यास तसे सांगावे.

शाक्य संघाच्या घटनेमध्ये ज्याप्रमाणे सदस्यांच्या कर्तव्याचा उल्लेख आहे, त्याचप्रमाणे सदस्यांच्या अपात्रतेचीही[१०३] नोंद करण्यात आली आहे. एखादा शाक्यसंघाचा सदस्य पुढील गोष्टीवरून अपात्र समजण्यात येत असे.

१) एखाद्या सदस्याने बलात्कार केल्यास.

२) एखाद्या सदस्याकडून कोणाचा खून झाल्यास.

३) एखाद्या सदस्याने चोरी केल्यास.

४) एखाद्या सदस्याने खोटी साक्ष दिली व तो आरोप सिद्ध झाला तर तो अपात्र समजण्यात येत असे.

गौतम बुद्धांनी शाक्यसंघाची दीक्षा घेतल्यानंतर अवघ्या आठ वर्षानीच शाक्य आणि कोलीय यांच्यामध्ये रोहिणी नदीच्या पाणीवाटपावरून संघर्ष निर्माण झाला. संघाच्या सेनापतीने कोलीयांच्या विरूद्ध युद्ध पुकारले. त्यास गौतम बुद्धांनी विरोध केला. परंतु त्यांचा विरोध बहुमताने मोडून काढण्यात आला. गौतम बुद्धांनी युद्धात सहभागी होण्यासही नकार दिला. त्यामुळे शाक्य संघाच्या नियमानुसार त्यांना देशत्यागाची शिक्षा भोगावी लागली.

**गौतम बुद्धांचा राजकीय प्रतिकाराचा सिद्धांत -**

शाक्य संघाशी झालेल्या मतभेदामुळे व युद्धात सहभागी होण्यास नकार दिल्यामुळे गौतम बुद्धांना शाक्य संघाच्या नियमानुसार देशत्याग केला. गौतम बुद्धांनी शाक्य संघाच्या हितासाठी व राजकीय अधिमान्यतेसाठी शिक्षा स्वीकारली. जेव्हा शाक्य आणि कोलीय यांच्यामध्ये रोहिणी नदीच्या पाणीवाटपावरून संघर्ष झाला त्यावेळेस शाक्य संघाच्या सेनापतीने कोलिय राज्याविरूद्ध युद्ध करून तो प्रश्न कायमचा निकालात काढावा असा ठराव मांडला.[१०४] तेव्हा या ठरावास गौतम बुद्धांनी विरोध केला. त्यांच्या मते, युद्ध करून कोणताही प्रश्न सुटत नाही. पहिल्या युद्धातच दुसऱ्या

युद्धाची बीजे रोवली जातात. तेव्हा संघाने कोलियाच्या विरूद्ध युद्ध करण्याची घाई न करता प्रथम दोष कोणाचा आहे याची चौकशी करावी. त्याबद्दलची खात्री करावी. ज्याप्रमाणे कोलियांचा दोष आहे, त्याचप्रमाणे शाक्यांचाही दोष असू शकतो. तेव्हा हा वाद कोलिय व शाक्यांनी लवादाच्या मार्फत मिटवावा.[१०५] परंतु सेनापतीच्या आग्रहास्तव सदर प्रस्ताव मतदानास टाकला गेला. त्यामध्ये गौतम बुद्धांचा पराभव जाला. मुळ प्रस्ताव मतास टाकला असता गौतम बुद्धांनी संघास युद्धाचा प्रस्ताव मान्य करू नये कारण परस्परांचा नाश करणे शहाणपणाचे ठरणार नाही असे सांगितले. तेव्हा सेनापती म्हणाला की, क्षत्रिय लोक युद्धामध्ये आपला किंवा परका असा भेद न करता, राज्याकरिता सख्या भावाशीही लढतात व त्यांचा तो धर्म त्यांनी पाळला पाहिजे.[१०६]

यज्ञयाग करणे हा ब्राह्मणांचा धर्म आहे. युद्ध करणे हा क्षत्रियांचा धर्म आहे. व्यापार करणे हा वैश्याचा धर्म आहे तर सेवा-चाकरी करणे हा शूद्राचा धर्म आहे व प्रत्येक वर्णाने आपल्या धर्माचे पालन केले तरच पुण्यप्राप्ती होते. व हीच आपल्या शास्त्राची आज्ञा आहे. तेव्हा गौतम बुद्धांनी सेनापतीच्या या मुद्दयाचे खंडन केले, वैराने वैर शमत नाही. वैरावर प्रेमानेच मात करता येते.[१०७] असा त्यांनी धर्माचा नवीन अर्थ लावला. गौतम बुद्धांच्या या विचारांमुळे अस्वस्थ होवून सेनापतीने या तत्त्वज्ञानाच्या चर्चेत व शिरता सदर प्रस्ताव मतास टाकावा असा आग्रह धरला व तो मतास टाकला असता सेनापतीच्या बाजूने मंजूर झाला.

दुसऱ्या दिवशी जेव्हा कोलियांच्यावर आक्रमण करण्यासाठी सैन्याची जमवाजमव सुरू झाली. प्रत्येक २० ते २५ वय वर्षाच्या प्रत्येक शाक्य पुरूषाने युद्धात सहभागी झाले पाहिजे असा नियम होता. ज्यांनी सेनापतीच्या ठरावाचे समर्थन केले होते, त्यांना ठराव स्वीकारण्यात काहीच अडचण नव्हती परंतु ज्यांनी ठरावाच्या विरोधात मतदान केले त्यांच्यासमोर बहुमताच्यापुढे झुकावे का झुकू नये हा प्रश्न निर्माण झाला. परंतु त्यांच्यापैकी उघडपणे कोणीही बोलू शकत नव्हते. परंतु गौतम बुद्धांनी बहुमताचा निर्णय मान्य केला मात्र सैन्यामध्ये सहभागी होण्यास नकार दिला.[१०८] तेव्हा सेनापतीने शाक्य संघाच्या हितसंबंधाची जोपासना केली नाही म्हणून

गौतम बुद्धांसमोर शिक्षा म्हणून पुढील तीन पर्याय ठेवले १) सैन्यात दाखल होवून युद्धात सामील होणे. २) देहान्त किंवा देशत्याग करणे ३) आपल्या कुटूंबियावर सामाजिक बहिष्कार ओढवून त्यांच्या मालमत्तेची जप्ती होवू देण्यास तयार होणे. यामधील देहान्त किंवा देशत्यागाची शिक्षा गौतमाने स्वीकारली. परंतु शाक्यसंघास कोसलाधिपतीच्या परवानगीशिवाय देहान्ताची शिक्षा देता येत नव्हती, त्यामुळे त्यांनी गौतम बुद्धांना देशत्यागाची शिक्षा ठोठावली. व ती गौतम बुद्धांनी स्वीकारली व परिव्रज्या धारण करून देशत्याग केला.

शाक्य व कोलिय यांच्या युद्धास विरोध केला असता गौतम बुद्धांच्या समोर राज्याच्या अधिमान्यतेचा प्रश्न उभा राहिल्याचे आपणास दिसून येते. राज्याचे हित हे सर्वोच्च असते, राज्याला शिक्षा देण्याचा अधिकार असतो. राज्याच्या विरोधात कोणी जावू नये. हे सर्वसामान्यपणे राज्याच्या अधिमान्यतेचे तत्त्व आहे. परंतु गौतम बुद्धांनी राज्याच्या चुकीच्या आज्ञा पाळू नयेत, आपल्या बुद्धीला जी गोष्ट पटत नाही तिचा प्रतिकार लोकशाही, सनदशीर मार्गाने करावा असे दाखवून दिले. गौतम बुद्धांच्या मते, संसदी बहुमतापेक्षा सत्य हे श्रेष्ठ असते. आपण अन्याय, अत्याचार करणाऱ्या गोष्टींचा विरोध करून शांतता व सामंजस्यावर आधारीत परस्पर संबंध निर्माण केले पाहिजेत, असा त्यांचा आग्रह होता.

अशाप्रकारे भगवान गौतम बुद्धांनी आपल्या विचारांमधून लोकशाही, गणराज्य व्यवस्थेचा पुरस्कार केला. गौतम बुद्धांनी आपल्या विचारांमध्ये व्यक्तीच्या मतास जास्तीत जास्त महत्त्व प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला, शिवाय जेव्हा व्यक्ती आणि राज्यसंस्था यांच्यामध्ये अधिमान्यतेचा प्रश्न निर्माण झाला तेव्हा राज्याची अधिमान्यता मान्य करून बहुमताचा निर्णय स्वीकारला.

## संदर्भ ग्रंथ सुची


१) डॉ. शर्मा रामशरण, (अनु. पंढरीनाथ रानडे), 'प्राचीन भारतातील राजकीय विचार आणि संस्था', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००६, पान नं. ७.

२) डॉ. यार्दी अमृत राघवेंद्र (भाषांतर), 'गौतम बुद्धाची आत्मकता', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९४, पान नं. ५६.

३) डॉ. आंबेडकर भिमराव, 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म', पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, सोळावी आवृत्ती-२००३, पान नं. २४४.

४) कित्ता पान नं. २४९

५) कित्ता पान नं. २४९

६) कित्ता पान नं. २५२

७) जोशी लक्ष्मणशास्त्री, 'वैदिक संस्कृतीचा विकास', प्रज्ञापाठशाळा मंडळ, वाई १९९६, पान नं. ३९१.

८) भागवत दुर्गा, 'सिद्धार्थ जातक' : खंड-३, वरदा बुक्स, पुणे, १९७७, पान नं.१८८.

९) कित्ता - खंड-१ला, पान नं. २५

१०) कित्ता - खंड-५वा, पान नं. ८१

११) कित्ता - खंड-५वा, पान नं. ७३

१२) कित्ता - पान नं. ७५

१३) कित्ता - खंड ३रा, पान नं. ९२

१४) कित्ता - वरीलप्रमाणे

१५) कित्ता - खंड ३रा, पान नं. ३६०

१६) कित्ता - खंड ५वा, पान नं. ८४,८५,८६

१७) कित्ता - पान नं. ८६,८७,८८

१८) कित्ता - पान नं. ८८,८९,९०

१९) कित्ता - खंड ३रा, पान नं. २१६

२०) कित्ता - ७ प्रमाणे — पान नं. ३५९

२१) कित्ता - वरीलप्रमाणे

२२) कित्ता — वरीलप्रमाणे पानं नं. ३६१

२३) धावरे वसंत (अनु.) 'दीघनिकाय', सुगावा प्रकाशन, पुणे, १९८८, पान नं.७४

२४) कित्ता

२५) कित्ता

२६) कित्ता

२७) Ghoshal U. N. - "A History of Indian Political Ideas" Oxford University Press, 1959, Page No. 77

२८) कित्ता

२९) कित्ता

३०) कित्ता — पानं नं. ७८

३१) कित्ता

३२) कित्ता

३३) कित्ता

३४) कित्ता — २ प्रमाणे, पान नं. २६६

३५) कित्ता — पान नं. २६७

३६) कित्ता — पान नं. २६८

३७) कित्ता — पान नं. ३८२

३८) कित्ता —

३९) कित्ता —

४०) Carus P. - "The Gospal of Buddha", Oman Communications, Tucesoun, 1972

४१) वाघ विलास (अनु.), 'बौद्ध धम्मात शिक्षेची संकल्पना', सुगावा प्रकाशन, पुणे, २००६, पान नं. प्रस्तावना

४२) कित्ता –

४३) कित्ता –

४४) कित्ता – २३ प्रमाणे, पान नं. ११५

४५) कित्ता –

४६) कित्ता – २३ प्रमाणे, पान नं. १०६

४७) कित्ता – २३ प्रमाणे, पान नं. १०६

४८) मोरखंडीकर रा. शा., 'प्राचीन भारतीय राजनीती', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७६, पान नं. ५२

४९) डॉ. शर्मा रामशरण, (मराठी) 'प्राचीन भारतातील राजकीय विचार आणि संस्था', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६, पान नं. ६७

५०) भागवत दुर्गा, (संपादीत), 'सिद्धार्थ-जातक'खंड-२, वरदा बुक्स,१९७५,पान नं.

५१) डॉ. छत्रे लता दिलीप, 'बोधीसत्त्वनीती', नवभारत (मासिक) अंक – नोव्हें. २००७, पान नं. २५

५२) कित्ता – ४९ प्रमाणे, खंड - ५वा, पान नं. ८१

५३) कित्ता – ४९ प्रमाणे, खंड - १ला, पान नं. १

५४) कित्ता – २ प्रमाणे, पान नं. ५२

५५) कित्ता – वरीलप्रमाणे

५६) कित्ता – २ प्रमाणे, पान नं. २५

५७) कित्ता – वरीलप्रमाणे

५८) डॉ. चौसाळकर अशोक, 'प्राचीन भारतीय गणराज्ये : काही विचार', नवभारत (मासिक) अंक, पान नं. ३२

५९) कित्ता – पान नं. ३३

६०) कित्ता – ४७ प्रमाणे, पान नं. १४२

६१) कित्ता – वरीलप्रमाणे पान नं. १४२

६२) कित्ता –

६३) कित्ता –

६४) कित्ता –

६५) कित्ता – पान नं. १४३

६६) कित्ता –

६७) कित्ता –

६८) Gade Arun Ramchandra, "Political Ideas & Constitutional Experiments in Ancient Indian Republics" A thesis submitted to Shivaji University, Kolhapur, Dept. of Political Science, Dec.-2004. Page No.

६९) कित्ता –

७०) कित्ता – ४७ प्रमाणे, पान नं. १५१

७१) प्रकरण – १ले, पान नं. १२

७२) कित्ता – २७ प्रमाणे, पान नं. १२

७३) कित्ता – वरील प्रमाणे

७४) कित्ता – ४९, खंड-२, पान नं.

७५) डांगे सिन्धू, 'बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८०, पान नं. ५२

७६) कित्ता – पान नं. ५३

७७) कित्ता – वरील प्रमाणे

७८) कित्ता – २ प्रमाणे, पान नं. ३२०

७९) कित्ता – वरील प्रमाणे

८०) कित्ता – ४ प्रमाणे, पान नं. २२

८१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखन आणि भाषणे, खंड-१८, भाग-३, प्रकाशक-महाराष्ट्र शासन, मुंबई-२००२, पान नं. १७१

८२) कित्ता – ७४ प्रमाणे, पान नं. ५६

८३) कित्ता – वरील प्रमाणे

८४) कित्ता – वरील प्रमाणे पान नं. ५७

८५) कित्ता – वरील प्रमाणे

८६) कित्ता – वरील प्रमाणे

८७) कित्ता – पान नं. ५८

८८) कित्ता – पान नं. ६०

८९) कित्ता – वरील प्रमाणे

९०) कित्ता – वरील प्रमाणे, पान नं. ६१

९१) कित्ता – वरील प्रमाणे, पान नं. ६२

९२) कित्ता – वरील प्रमाणे

९३) कित्ता – ४० प्रमाणे, पान नं. २२

९४) कित्ता – ४७ प्रमाणे, पान नं. १५३

९५) कित्ता – वरील प्रमाणे

९६) कित्ता – वरील प्रमाणे, पान नं. १५४

९७) जोशी लक्ष्मणशास्त्री, 'वैदिक संस्कृतीचा इतिहास', प्रज्ञापाठशाला प्रकाशन, वाई, १९९६, पान नं. ३९१

९८) कित्ता – वरील प्रमाणे

९९) कित्ता – ४७ प्रमाणे, पान नं. १४९

१००) कित्ता – २ प्रमाणे, पान नं. २२

१०१) कित्ता – २ प्रमाणे, पान नं. २२, २३

१०२) कित्ता – पान नं. २३

१०३) कित्ता – पान नं. २५

१०४) कित्ता –

१०५) कित्ता – पान नं. २६